25 Nov 2026_Layout 1 11/24/2026 11:57 PM Page 1

बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्हयात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर/November
बुधवार/Wednesday
दि.२५/Dt: 25
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

www.jagmitra.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक ३३/Issue 33 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

बीडमध्ये हजारो कोटींचा जीएसटी महाघोटाळा?

जीएसटी घोटाळा (स्कॅम) करून शासनाचा महसूल बुडवणाऱ्या आर्थिक राक्षसांना अटक कधी?

गोरगरिबांचे रेशन कार्ड बंद पाडून पांढरपेशी राक्षस मोकाट; जीएसटी विभागाच्या भूमिकेवर संशयाचे धुके!

उपासमारीची वेळ आल्यास पीडित कुटुंबे आत्महत्येच्या उंबरठ्यावर; याला प्रशासन आणि जीएसटी विभागच जबाबदार राहणार!



असा उलगडणार घोटाळ्याचा संपूर्ण कट...

स्वस्त धान्य दुकानदारांकडे आलेल्या यादांमध्ये ज्या गरीब नागरिकांची नावे आहेत, त्यांना विश्वासात घेऊन पोलिसांनी चौकशी केल्यास, त्यांची कागदपत्रे कोणी गोळा केली, कोणी पैशांचे आमिष दाखवले आणि कोणाच्या सांगण्यावरून बँक खाती व जीएसटी क्रमांक काढले गेले, याची संपूर्ण साखळी उघड होणार आहे. या चौकशीतून बोगस बिले बनवून शासनाला कोट्यवधींचा चुना लावणाऱ्या मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचणे पोलिसांना सहज शक्य होणार आहे.

बीड/जगमित्र न्यूज

मजुरी करून पोटाची खळगी भरणाऱ्या हजारो गोरगरिबांच्या कागदपत्रांचा गैरवापर करून बीड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांचा बोगस जीएसटी घोटाळा सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घोटाळ्यामुळे एकीकडे दलाल आणि बोगस कंपन्यांचे मालक कोट्यधीश होत असताना, दुसरीकडे कागदोपत्री कोट्यवधींची उलाढाल दाखवली गेल्याने हजारो गरीब कुटुंबांचे रेशन कार्ड बंद झाले आहे. या गंभीर प्रकारानंतरही प्रशासनाने मौन बाळगल्याने, ''जीएसटी विभाग झोपा काढत आहे का?'' असा संतप्त सवाल बीडच्या जनतेतून विचारला जात आहे. जिल्ह्यातील गरीब व गरजू नागरिकांना किरकोळ पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर महत्त्वाची कागदपत्रे गोळा केली जात आहेत. या कागदपत्रांच्या आधारे अस्तित्वात नसलेल्या डमी कंपन्या उभारून त्यांच्या नावावर जीएसटी क्रमांक आणि बँक खाती उघडली जातात. त्यानंतर टक्केवारीच्या मोबदल्यात बड्या कंपन्यांना कोट्यवधी रुपयांची बोगस बिले पुरवून शासनाचा महसूल बुडवला जात आहे.वर्षानुवर्षे मोलमजुरी करणाऱ्या नागरिकांच्या नावावर वार्षिक कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचे सरकारी प्रणालीत दिसू लागल्याने, या सर्व गरीब कुटुंबांचे हक्काचे रेशन कार्ड तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरवून बंद करण्यात आले. हक्काचे धान्य बंद झाल्याने धास्तावलेल्या नागरिकांनी चौकशी केली असता, आपल्या नावावर बोगस कंपन्या सुरू असल्याचा हा महाघोटाळा उघडकीस आला.

जीएसटी विभागाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी न करताच डमी कंपन्यांना जीएसटी क्रमांक दिलेच कसे?

बीड पोलीस पांढरपेशी गुन्हेगारांना बेड्या ठोकणार का?

एकीकडे गोरगरीब कुटुंबांच्या तोंडचा घास हिरावला गेला असताना, दुसरीकडे या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार अद्याप मोकाट फिरत आहेत. रेशन दुकानदारांकडे या महाघोटाळ्याचा सर्वात मोठा पुरावा (याद्या) उपलब्ध असताना, आता बीड पोलीस दल या प्रकरणाची स्वत:हून दखल घेऊन स्वस्त धान्य दुकानदारांकडून या याद्या जप्त करणार का आणि या पांढरपेशी राक्षसांना बेड्या ठोकणार का? याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक वृत्तपत्रांमध्ये या घोटाळ्याच्या बातम्या सातत्याने प्रसिद्ध होऊनही, गोरगरिबांच्या जिवावर उठलेले हे आर्थिक राक्षस अद्याप मोकाटच आहेत. कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने झटपट श्रीमंत होण्यासाठी जिल्ह्यात नवीन दलालांची टोळी सक्रिय झाली आहे. धक्कादायक म्हणजे, प्रत्यक्ष स्थळ पाहणी न करताच बोगस कंपन्यांना जीएसटी क्रमांक दिले जात असल्याने, या महाघोटाळ्यात जीएसटी विभागातीलच काही भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचारी सामील असल्याची जोरदार चर्चा संपूर्ण जिल्ह्यात रंगली आहे.

प्रशासनाला इशारा आणि जनतेच्या प्रमुख मागण्या...

प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे तात्काळ लक्ष देऊन हा जीएसटी घोटाळा मोडीत काढावा, अन्यथा उपासमारीची वेळ आलेल्या गरीब कुटुंबांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढण्याची भीती जाणकार नागरिकांनी व्यक्त केली आहे. अशी दुर्दैवी घटना घडल्यास याला सर्वस्वी डोळेझाक करणारे बीड प्रशासन आणि मूग गिळून गप्प बसलेला जीएसटी विभाग जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून प्रशासनाकडे खालील ठोस मागण्या करण्यात आल्या आहेत. फसवणूक झालेल्या हजारो गोरगरिबांची सखोल चौकशी करून त्यांचे बंद झालेले रेशन कार्ड तात्काळ पूर्ववत सुरू करावेत. जीएसटी विभागाने नवीन जीएसटी क्रमांक देण्यापूर्वी संबंधित कंपनी प्रत्यक्षात अस्तित्वात आहे की नाही, याची कठोर स्थळ पाहणी करावी. सध्या सुरू असलेले सर्व बोगस जीएसटी क्रमांक तात्काळ रद्द करून, यामागील मुख्य सूत्रधार आणि दलालांवर मोक्का किंवा तत्सम गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत, जेणेकरून भविष्यात असा गुन्हा करण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही.

बीड अपघात प्रकरणात ट्विस्ट, भाजप नगरसेवकाच्या मुलावर दाम्पत्याला उडवल्याचा आरोप

पण पोलिसांकडून दुसऱ्याच मुलाच्या वडिलांना बेड्या, नेमकं काय घडलं?

बीड/प्रतिनिधी

माजलगाव गायकवाड दांपत्य अपघात प्रकरणात पोलिसांनी कारवाई केली आहे. अल्पवयीन मुलाच्या पालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संभाजी नाईकनवरे यांच्यावर गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर संभाजी नाईकनवरे यांना माजलगाव शहर पोलिसांनी अटक केली आहे. आज माजलगाव येथील न्यायालयात हजर करणार आहेत. तर अल्पवयीन मुलाला बीड (पान २ वर)



गायरानधारकांची फरफट थांबवा! जिल्ह्यातील गावनिहाय गायरान क्षेत्र जाहीर करा!

गोरगरीबांनाच गायरानावरून टार्गेट, मग धनदांडग्यांना अभय का?

धारूर/अतूल शिनगारे

धारूर जिल्ह्यातील गायरान जमिनींच्या प्रश्नावर प्रशासनाने पारदर्शक भूमिका घेण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी मंगळवारी दिली गायरान जमिनीवरील अतिक्रमणाच्या नावाखाली गोर-गरीब, भूमिहीन आणि सामान्य नागरिकांना लक्ष्य केले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. मात्र, दुसरीकडे प्रभावशाली आणि धनदांडग्या लोकांच्या ताब्यात असलेल्या जमिनींबाबत प्रशासनाची भूमिका काय आहे, असा सवाल ही डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी उपस्थित करत

जिल्हाधिकाऱ्यांना डॉ.जितेंद्र ओव्हाळ यांच थेट आव्हान!



जिल्हाधिकारी यांना थेट आव्हान केले की, बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावातील एकूण गायरान क्षेत्र किती आहे, किती क्षेत्रावर अतिक्रमण आहे, किती क्षेत्र शिल्लक आहे आणि किती क्षेत्र विविध प्रयोजनांसाठी हस्तांतरित करण्यात आले आहे, याची संपूर्ण गावनिहाय माहिती सार्वजनिक करा.प्रशासनाने सर्वप्रथम गायरान जमिनींचे अधिकृत अभिलेख तपासून (पान २ वर)

श्री गुरु नानक देव जी महाराजांच्या ५५७ व्या प्रकाशोत्सवानिमित्त परळीत विशेष यात्रा रेल्वेचे स्वागत

परळी वैजनाथ/ प्रतिनिधी

शीख धर्माचे संस्थापक श्री गुरु नानक देव जी महाराज यांच्या ५५७ व्या प्रकाशोत्सवानिमित्त नांदेड येथून निघालेल्या पवित्र यात्रेच्या विशेष रेल्वेगाडीचे परळी वैजनाथ रेल्वे स्थानकावर अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ते गुरुद्वारा नानक झिरा साहिब (बीदर) या पवित्र यात्रेसाठी या विशेष रेल्वेगाडीचे आयोजन करण्यात आले आहे. ही विशेष रेल्वे परळी वैजनाथ स्थानकावर दाखल होताच उपस्थित (पान २ वर)



कार्तिकी पौर्णिमेला भाविकांची गैरसोय; न.प.चा नियोजनशून्य कारभार

श्री कालरात्री देवीच्या दर्शनासाठी खड्डयातून मार्गक्रमण; रस्ते बंद करून भाविकांची अडवणूक कशासाठी?-अभयकुमार ठक्करांचा संताप!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

हिंदू धर्मीयांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या कार्तिक पौर्णिमेनिमित्त परळी शहराचे ग्रामदैवत श्री कालरात्री देवीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी होत असताना नगर परिषदेने याच दिवशी मंदिराकडे जाणाऱ्या धनमना देवी ते काळरात्री मंदिर मार्गावर खड्डा खोडल्याने भाविकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. नगर परिषदेच्या या नियोजनशून्य कारभाराचा शिवसेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष अभयकुमार ठक्कर यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे.

श्री कालरात्री देवीच्या दर्शनासाठी दर मंगळवारी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. मात्र, भाविकांची गर्दी आणि धार्मिक महत्त्व लक्षात न घेता धनमनादेवी मंदिर ते काळरात्री मंदिर मार्गावर मोठा खड्डा खोदून ठेवला असल्याने भाविकांना



दर्शनासाठी जावे लागत आहे. याशिवाय अंबेवेस येथील पुलावरही कामे सुरू असल्याने श्री वैद्यनाथ मंदिराकडे जाणारा मार्ग बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.

धार्मिक सण आणि भाविकांची गर्दी माहीत असतानाही नगर परिषदेला कामांचे नियोजन करता येत नाही का? असा सवाल उपस्थित करत अभयकुमार ठक्कर यांनी प्रशासनाच्या (पान २ वर)

मराठवाडा अर्बन क्रेडिट सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांच्या अडचणीत वाढ!

५ लाखांच्या मुदत ठेवी परत न केल्याचा आरोप; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाचे न्यायालयाचे आदेश

माजलगाव/प्रतिनिधी

माजलगाव येथील मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखेतील मुदत ठेवींची रक्कम मुदत संपल्यानंतरही परत न केल्याच्या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. ठेवीदाराची तब्बल पाच लाख रुपयांची रक्कम परत न केल्याप्रकरणी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश माजलगाव येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



या प्रकरणातील फिर्यादी विष्णू किसनराव आळसे यांनी मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, शाखा माजलगाव येथे मुदत ठेवी ठेवल्या होत्या. संस्थेचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, शाखाधिकारी, संस्थेचे कर्मचारी व क्लार्क यांनी मुदत ठेवींवर जास्तीचे व्याजदर देण्याचे आमिष दाखविल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने वेगवेगळ्या तारखांना संस्थेत मुदत ठेवी जमा केल्या.

यामध्ये २८ एप्रिल २०२३ रोजी दोन लाख रुपये, ११ जुलै २०२३ रोजी एक लाख रुपये, तसेच ८ जून २०२३ रोजी प्रत्येकी एक लाख रुपयांच्या दोन अशा एकूण पाच लाख रुपयांच्या मुदत ठेवी ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, मुदत संपल्यानंतरही संबंधित रक्कम फिर्यादीला परत मिळाली नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, मुदत ठेवींची मुदत संपल्यानंतरही संस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व कर्मचाऱ्यांनी ठेवीची रक्कम परत न दिल्याने फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली. पोलीस उपअधीक्षक, पोलीस अधीक्षक आणि माजलगाव पोलीस निरीक्षक यांच्याकडे लेखी तक्रारी देऊनही संबंधितांवर कारवाई झाली नसल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

त्यानंतर फिर्यादीने न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. संस्थेचे पदाधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांविरोधात भारतीय दंड संहितेतील कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ३४ तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ (पान २ वर)



महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

गोविंदसिंह राजपुत (जिल्हा प्रतिनिधी) मो. 9921876500 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती बुधवार दि.२५ नोव्हेंबर २०२६ पान नं. २

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

मराठवाडा विभागस्तरीय लोक संचलित साधन केंद्राची कार्यशाळा संपन्न

धाराशिव,दि.२३ नोव्हेंबर (जिमाका) महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत नव तेजस्विनी प्रकल्पांतर्गत मराठवाडा विभागस्तरीय लोक संचलित साधन केंद्र कार्यशाळा दिनांक १९ नोव्हेंबर रोजी अनुराधा मंगल कार्यालय,कावलधारा, ता.जि. धाराशिव येथे संपन्न झाली. यावेळी उद्घाटक म्हणून किर्ती किरण पुजार जिल्हाधिकारी, धाराशिव व प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेचे प्रास्तविक संदिप मराठे (विभागीय सल्लागार), यांनी केले. तसेच यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना जिल्हधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दुष्काळ निवारण उपाययोजना साठी जिल्ह्यात चारा व पाणी नियोजनची माहिती दिली. तसेच कुटुंब व गाव विकासासाठी महिलांचे योगदान कौतुकास्पद असल्याचे सांगितले. त्याच प्रमाणे



जास्तीत जास्त महिलांनी शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी करण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी माविम च्या महिला बचतगट मार्फत होत असलेल्या ९९% बँक कर्ज परतफेडीचे अभिनंदन केले. तसेच बचतगटाचे कर्ज घेऊन चांगले नाविन्यपूर्ण उद्योग व्यवसाय करून त्याची मार्केटिंग करण्याचे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

या परिसंवाद कार्यशाळेमध्ये विविध विषयावर पॅनल डिस्कशन घेण्यात आले. यामध्ये मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्याच्या लीडर्स महिलांनी भाग घेतला. पॅनल डिस्कशनमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम-सेंद्रिय शेती, दुष्काळ निवारण उपाययोजना, जलसंवर्धन, हवामान बदलाचे परिणाम व उपाययोजना , लोक संचलित साधन केंद्र ची सध्यस्थिती व व्हिजन बिल्डिंग, प्रशासकीय व्यवस्थापन व आर्थिक व्यवस्थापन इत्यादी विषयावर सविस्तर चर्चा झाली. या पॅनल डिस्कशन समिती चे सदस्य म्हणून प्रा.गणेश चादरे (तुळजापूर), प्रा.डॉ. संतोष थिटे , बाबुराव पाटील महाविद्यालय, अनगर जिल्हा सोलापूर व श्रीमती वैशाली घुगे (मास्टर ट्रेनर, यशदा) यांची उपस्थिती होती. या मराठवाडा विभागीय परिसंवाद कार्यशाळेमध्ये सध्यस्थिती व सामाजिक प्रश्नावर अवलंबून ग्रामीण कलाकारांमार्फत जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आले. तसेच हायड्रोफोनिक व आझोला चारा युनिट डेमो मांडणी करण्यात आली होती. यावेळी उपस्थित महिलांना कुपोषण निर्मुलनासाठी परसबाग करिता विविध प्रकारचे २१ देशी बियाणे असणारे ५५० पॉकेट वाटप करण्यात आले.

‘जागतिक मत्स्य दिन’ साजरा

मच्छिमारांसाठी विशेष मार्गदर्शन व ऑनलाइन अर्ज नोंदणी शिबिर संपन्न



धाराशिव/जिमाका

जागतिक मत्स्य दिनाचे औचित्य साधून दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी परांडा, जि. धाराशिव येथे मत्स्यव्यवसाय विभाग, धाराशिव यांच्यामार्फत मच्छिमारांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराची प्रमुख वैशिष्ट्ये: योजनेची सविस्तर माहिती: या कार्यक्रमात शासनाच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजने’च्या अटी, पात्रता आणि त्यातून मिळणाऱ्या लाभांविषयी उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यात आली.

ऑनलाइन अर्ज व प्रात्यक्षिक: मच्छिमारांना तांत्रिक अडचणी येऊ नयेत यासाठी ‘महाडीबीटी’ पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया आणि ‘महा-आयडी’ तयार करण्याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. तसेच, शिबिराच्या ठिकाणीच अनेक मच्छिमारांचे ऑनलाइन अर्ज भरून घेण्यात आले.

तांत्रिक मार्गदर्शन व उपस्थिती: या शिबिरामध्ये मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी अविनाश गायकवाड आणि सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी अर्जिक्य देवकाते यांनी उपस्थित मच्छिमारांना योजनेच्या अंमलबजावणीबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध मच्छिमार सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सभासद आणि मत्स्यव्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून....

बीड अपघात

येथील न्यायमंडळासमोर हजर करण्यात येणार आहे. संभाजी नाईकनवरे यांचा अल्पवयीन मुलगा गाडी चालवत असल्याचा व्हिडिओ समोर आला होता होता. गाडी चालवणारा मुलगा अल्पवयीन असल्याने पालक संभाजी नाईकनवरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काल माझा मुलगा गाडी चालवत नसल्याचे भाजप नगरसेवक दीपक मेंडके यांनी सांगितले, त्यांनी एक व्हिडिओ देखील समोर आणला, आता या प्रकरणात पोलिसांकडून रेस बाबतचा तपास केला जात आहे. भाजप नगरसेवकाच्या मुलाने भरधाव कार चालवताना केलेल्या अपघातामध्ये एका दाम्पत्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. बीडच्या माजलगाव येथे ही घटना घडली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. यामध्ये भाजप नगरसेवकाच्या मुलाच्या कारने दिलेल्या धडकेत दोन्ही पती-पत्नी हवेत उडाल्याचे सीसीटीव्हीत दिसत आहे. ही धडक इतकी भीषण होती की, रुग्णालयात उपचाराला नेण्यापूर्वीच पती-पत्नीचा मृत्यू झाला. हे पती-पत्नी त्यांच्या दुचाकीवरुन जात असताना भाजप नगरसेवकाच्या मुलाने त्यांना कारने उडवले. माजलगाव येथील भाजपाचे नगरसेवक दिलीप मेंडके यांचा मुलगा दक्ष मेंडके हा युवक चारचाकी गाडी चालवत होता. यावेळी तरुणांची गाड्यांची रेस सुरू होती, असं स्थानिकांनी सांगितले. तसेच या शर्यतीच्या वेळी दुचाकीवरील कुटुंबाला शंभर ते दीडशे फुट फरफटत नेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. बीडच्या माजलगाव येथील गढी रोडवर झालेल्या अपघाताचा सीसीटीव्ही आता समोर आला आहे. २० नोव्हेंबर रोजी दुपारी घडलेल्या या अपघातामध्ये गायकवाड दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. गढी रोडवरील पेट्रोल पंपाजवळ समोरून येणाऱ्या गायकवाड यांच्या दुचाकीला धडक दिली होती. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला असून यामध्ये धडकेनंतर गायकवाड दाम्पत्य हे हवेत उंच उडून खाली रस्त्यावर पडल्याचे स्पष्ट दिसत आहे. या अपघातात प्रल्हाद गायकवाड हे जागीच ठार झाले होते तर सुनीता गायकवाड यांना उपचारासाठी घेऊन जात असताना त्यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी माजलगाव पोलीस ठाण्यात गायकवाड दाम्पत्याच्या मुलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नगरसेवक दीपक मेंडके यांचा मुलगा दक्ष मेंडके विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात दोन मित्रांमध्ये गाड्यांच्या शर्यतीतून घडल्याची चर्चा माजलगाव शहरात होत असून त्या दिशेने पोलीस तपास करत आहेत.

.....

फरफट थांबवा!

गावनिहाय यादी प्रसिद्ध करावी. अतिक्रमणधारकांची माहिती, अतिक्रमणाचे क्षेत्रफळ आणि त्यावरील कारवाईचा तपशीलही जनतेसमोर आणावा.गायरान जमिनींच्या बाबतीत कारवाई करायची असेल तर ती कोणताही भेदभाव न करता सर्वांसाठी समान असली पाहिजे. केवळ गरीब आणि भूमिहीन नागरिकांवर कारवाई करून प्रभावशाली लोकांना अभय मिळत असेल तर ते खपवून घेतलं जाणार नाही जिल्ह्यातील गायरान क्षेत्राची माहिती जनतेपासून का लपवली जाते? गावनिहाय आकडेवारी जाहीर करण्यास प्रशासनाला अडचण काय आहे? गायरान जमिनींच्या प्रश्नावर गरीब नागरिकांची फरफट थांबवावी. प्रशासनाने पारदर्शकता दाखवून संपूर्ण माहिती जनतेसमोर आणावी. अन्यथा या प्रश्नावर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हा अध्यक्ष विकास वाव्हळ दया वाघमारे हिराचंद काळे बळीराम मस्के अशोक सरवदे राकेश शिरसट रमेश थोरात संजय वाव्हळ कृष्णा पवार सूरज खळगे सुनील घाटुळ यांनी दिला आहे.

.....

विशेष यात्रा

भाविक आणि मान्यवरांनी संतगण महाराजांचे स्वागत करून त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी रेल्वे स्थानक परिसर वाहेगुरू जी का खालसा, वाहेगुरू जी की फतेह या जयघोषाने दुमदुमून गेला होता. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यात्रेकरूंसाठी परळीतील भाटिया परिवाराच्या वतीने भव्य लंगर सेवेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास उपस्थित असलेल्या मान्यवरांनी स्वतः लंगर सेवेत सहभागी होत यात्रेकरूंची सेवा केली. शीख बांधवांची श्रद्धा, निःस्वार्थ सेवा आणि समर्पणाची ही परंपरा अत्यंत प्रेरणादायी असून, संतगण महाराजांचे आशीर्वाद लाभणे हे आपल्यासाठी अत्यंत आनंदाचे आणि भाग्याचे असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या स्वागत सोहळ्यास स्थानिक नागरिक, शीख बांधव आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.....

अभयकुमार ठक्कर

कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. यापुढे दर्शनासाठी जाणारा मार्ग नगर परिषदेने अशाच प्रकारे बंद केला किंवा भाविकांची गैरसोय केली, तर शिवसेना स्टाईलने जशास तसे उत्तर दिले जाईल, असा स्पष्ट इशाराही अभयकुमार ठक्कर यांनी दिला आहे. धार्मिक श्रद्धेच्या या महत्त्वपूर्ण दिवशी भाविकांना मूलभूत सुविधांऐवजी बंद रस्त्यांचा सामना करावा लागत असल्याने नगर परिषदेने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष देऊन भाविकांसाठी मार्ग मोकळा करावा, अन्यथा नगरपरिषदेस ताळ्यावर आणण्यासाठी आंदोलन केले जाईल असा इशारा शिवसेनेचे माजी उपजिल्हा प्रमुख व माजी उपनगराध्यक्ष अभयकुमार ठक्कर यांनी दिला आहे.

.....

मराठवाडा अर्बन

मधील कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करून तपास करण्याची मागणी करण्यात आली होती. फिर्यादीच्या वतीने ॲड. आर. के. गवते यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. दाखल करण्यात आलेली कागदपत्रे आणि फिर्यादीची बाजू विचारात घेत माजलगाव येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी अर्ज मंजूर केला. तसेच संबंधित सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले.

या सहा जणांविरोधात तपासाचे आदेश

१. सतीश गंगाधर सावंत २. किशोरी सतीश सावंत ३. गजानन विठ्ठलराव डासाळकर ४. अमोल सुखदेव अंधारे ५. सचिन आत्माराम ढकळी ६. सुरेखा अजय बाबुळगावकर.

या प्रकरणातील न्यायालयीन लढ्यात ॲड. आर. के. गवते यांनी फिर्यादीची बाजू मांडली, तर ॲड. एन. आर. जावळे यांनी सहकार्य केले. पाच लाखांच्या ठेवींचा प्रश्न आता न्यायालयात पोहोचला असून, न्यायालयाच्या आदेशानंतर पोलीस तपासात काय निष्पन्न होते, याकडे माजलगावच्या ठेवीदारांचे लक्ष लागले आहे. ठेवीदारांच्या पैशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

शेवटच्या पानावरून...

आक्रमक सवाल

कोठारी आयोगासह विविध आयोगांनी शिक्षणावर जीडीपीच्या ६ टक्के खर्च करण्याची शिफारस केली असली, तरी प्रत्यक्षात किती खर्च होतो, हे पाहण्याची तसदी घेतली जात नसल्याचे सांगण्यात आले. आ. बंब यांना शिक्षक फोबिया झाला असून, त्यातून त्यांनी बाहेर यावे, असा टोलाही लगावण्यात आला. ''एखादा शिक्षक चुकत असेल तर नक्कीच कान धरा आणि कारवाई करा; पण काही जणांच्या चुकांवरून संपूर्ण शिक्षक समाजाला झोडपण्याचा प्रकार निषेधार्ह आहे. ९९ टक्के शिक्षक समर्पित भावनेने आणि देशसेवेच्या भावनेने काम करतात.''

सर्वसामान्यांचे शिक्षणाचे दरवाजे बंद करू नका

कॉन्व्हेंट आणि महागड्या शाळांची प्रचंड फी देशातील ९० टक्के लोकांना परवडणारी नाही, याचे भान राखण्याचा सल्ला देण्यात आला आहे. २०४७ पर्यंत देश महासत्ता बनवायचा असेल, तर खाजगीकरणाच्या माध्यमातून सर्वसामान्यांसाठी शिक्षणाचे दरवाजे बंद करणे घातक ठरेल. त्याऐवजी यूजी टू पीजी सर्वांना समान आणि मोफत शिक्षण कसे मिळेल, तसेच प्रलंबित प्रश्नांवर विधानसभेत आणि मतदारसंघात ठोस भूमिका मांडावी, असे आवाहन राजकुमार कदम यांनी केले आहे.

.....

कार्यकारणी जाहीर

सौ.शिल्पा ढवळे, सौ.मिरा राऊत, सौ।मोहिनी काळे(आखाडे) यांची निवड करण्यात आली. या कार्यकारणी साठी बीड न.प.च्या नगरसेविका सौ.सावित्री नितीन साखरे व पदमा वादे यांनी अनुमोदन दिले. या वेळीसौ.छाया राऊत(लांडगे) सौ.स्वप्ना काळे (शिंदे), सौ.वर्षा लांडगे (राऊत), सौ.मीरा कांता राऊत, सौ.पुजा लांडगे, सौ.पार्वती थोरात, सौ.छाया थोरात, सौ.राजश्री राऊत, सौ.राधा राऊत यांच्यासह पदाधिकारी, फुले-शाहू-आंबेडकर प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.....

जैतापूर

झालेला प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक जनावरापर्यंत घरपोच चारा पोहोचविण्याचे काम केले जाईल. असे त्यांनी सांगितले.शेतकऱ्यांना शेतीच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी सर्व पिकांबाबत मोफत कृषी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच आवश्यकतेनुसार रोपवाटप करून शेतकऱ्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी मदत केली जाणार आहे. केवळ तात्पुरती मदत न करता भविष्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांवर विशेष भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यासाठी जलतारा प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक साहित्य संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.पाणी आडवा, पाणी जिरवा हा संदेश घेऊन प्रत्येक गावात जलसंधारणाची चळवळ उभी राहिली पाहिजे. पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत जिरविणे, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आणि शेतीला पाण्याची शाश्वत उपलब्धता निर्माण करणे ही काळाची गरज आहे, असे मत मयंक गांधी यांनी व्यक्त केले.

मी तुमचा भाऊ आहे,काळजी करू नका-मयंक गांधी

यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी अत्यंत आपुलकीने, ''मी तुमचा भाऊ आहे. तुम्ही काळजी करू नका. या संकटाच्या काळात मी तुमच्यासोबत आहे. तुम्हाला एकटे सोडणार नाही. मी आणि सरकार मिळून काम करून तुम्हाला शक्य ती सर्व मदत व साथ देऊ,'' अशा शब्दांत मयंक गांधी यांनी ग्रामस्थांना विश्वास दिला.

आपल्या दुरदृष्टीमुळेच भिषण दुष्काळातही गावातील विहिरी,बोअरला पाणी-सरपंच भागवत दराडे

''मयंक गांधी सर, आपण केलेल्या नदी खोलीकरण व रिचार्ज बोरच्या कामांमुळे केवळ एका पावसात नदी, नाले व बंधारे भरले. रिचार्ज बोरमुळे आजही गावातील विहिरींना पाणी टिकून आहे. पाण्याचे योग्य नियोजन केलेल्या शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीतही गतवर्षीपेक्षा यंदा अधिक पीक घेता आले. हे सर्व आपल्या आणि आपल्या संस्थेच्या दूरदृष्टीपूर्ण कार्यामुळे शक्य झाले. आपणासह आपल्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार!''भविष्यातही आपले सहकार्य असेच लाभावे.असे मत सरपंच भागवत दराडे यांनी व्यक्त केले.

.....

नारायण गवते

यांच्यासह अनेक शिक्षकवृंद, मान्यवर व पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांचे प्रश्न, शैक्षणिक क्षेत्रातील विविध समस्या तसेच शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटनात्मक पातळीवर प्रभावीपणे काम करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी नारायण गवते सर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यतत्परतेचा पक्ष संघटन वाढीसाठी निश्चितच लाभ होईल. त्यांच्या माध्यमातून शिक्षक आघाडीचे संघटन अधिक सक्षम व बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नियुक्तीनंतर उपस्थित मान्यवरांनी नारायण गवते सर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

.....

वंदन यात्रा

वाढविण्यासह संत रोहिदास महाराजांच्या विचारांचा आणि सामाजिक समरसतेचा संदेश जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ स्वरूपसिंह हजारी, माजलगाव विधानसभा मतदार संघाचे नेते माधव तात्या निर्मळ, बालासाहेब चोले यांनी उपस्थितांना आपल्या मार्गदर्शनातून दिला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.....

डॉ.संतोष मुंडे

वाढवले, शिक्षण दिले आणि त्यांच्यावर उत्तम संस्कार केले. आईच्या याच संघर्षाचा, त्यागाचा आणि ममतेचा गौरव करण्यासाठी मुलांनी एकत्र येत हा अनोखा सोहळा आयोजित केला होता. यावेळी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, माजी आमदार संजय दौंड, पंचायत समितीचे सभापती पिंटू मुंडे, टोकवाडीचे सरपंच डॉ. राजाराम मुंडे, ह.भ.प. तुकाराम महाराज शास्त्री, ह.भ.प. गणेश महाराज सोनवणे, संजय मुंडे, गणेश मुंडे, भक्ततराम फड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सन्मानाबद्दल डॉ. संतोष मुंडे यांनी आयोजक डॉ. भरत मुंडे व त्यांच्या संपूर्ण परिवाराचे आभार व्यक्त केले.

जाहीर प्रगटन

परळी शहर व तालुक्यातील आणि सिरसाळा येथील तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे १. मोहम्मद हारुण सय्यद रा. हमालवाडी, परळी वै. जि. बीड. २. आरेफ पिता रईस कुरेशी रा. कुरेशी नगर, परळी वै. जि. बीड यांनी आमच्या ऑफिसवर येऊन माहिती, सुचना व कागदपत्र दिल्यावरुन तसेच अधिकार दिल्यावरुन सदर जाहिर प्रगटन देण्यात येते की, मिर्झा सलमान महेफुज बेग रा. सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड यांना त्यांचे नांवा-वरील जमीन विक्री करावयाची असल्याने आमचे पक्षकाराची त्यांच्या सोबत ओहख झाली व त्यांनी त्यांचे नांवावरील मौजे सिरसाळा येथील जमीन गट क्र. ६८ मधील एकुण क्षेत्र ०७ हेक्टर ८२ आर जमीनीपैकी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर जमीन जिची चतुर्सिम पुर्वेस -नोमाण महेफुज बेग, पश्चिमेस - देशमुख यांची जमीन, दक्षिणेस पोहनेर रस्ता व २० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस- बालाजी कैलास ढेंबरे यांची जमीन., वरील चतुसिमेच्या आतील संपुर्ण ०२ हेक्टर ०० आर जमीन आमचे पक्षकारास दि. ०५.०२.२०२५ रोजी कायमस्वरुपी विक्री करण्याचा ठराव नोटरी रजि. दस्त क्र. १८२/२०२५ अन्वये केला व सदर दिवशी आमचे पक्षकाराने मिर्झा सलमान महेफुज बेग यांना ईसारापोटी रक्कम रु. ३,००,०००/- अक्षरी तीन लाख रुपये दिले आहेत व त्यांनी आमचे पक्षकाराच्या हक्कात रक्कम मिळाल्या बाबतची रशीद पावती व ईसारपावती लिहून दिलेली आहे व आमचे पक्षकाराचा प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन ताबा व कब्जा मिर्झा सलमान महेफुज बेग यांनी करुन दिलेला आहे व तेंव्हापासून आमचे पक्षकार हे सदरील शेत जमीनीचा वापर व उपभोग घेत आहेत व आज रोजी सदरील शेत जमीन आमचे पक्षकाराच्या ताबे कब्जेउपभोगात आहे. आमचे पक्षकाराने मिर्झा सलमान महेफुज बेग यांना बाकी राहिलेली रक्कम स्विकारुन रितसर खरेदीखत आमचे पक्षकाराच्या नांवे करुन द्यावे असे बऱ्याच वेळा तोंडी व नोटीसव्दारे कळविलेले आहे. परंतु असे असतांना सुध्दा मिर्झा सलमान महेफुज बेग हे महसूल अभिलेखात त्यांचे नांवाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून सदरची शेत जमीन मिळकत जास्तीची रक्कम घेवून आमचे पक्षकाराच्या हक्कात खरेदीखत करुन न देता त्यांचे परस्पर ईतर कोणासही विक्री, हस्तांतरण, गहाण, तारण, बक्षीस, ईसारपावती, दानपत्र करण्याच्या प्रयत्नात आहेत किंवा सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेचे, व्यक्तीचे कर्ज घेण्याच्या तयारीत आहेत व तसे झाले तर आमचे पक्षकाराचे कधीही न भरुन येणारे असे आतोनात नुकसान होणार आहे.

तरी सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मिर्झा सलमान महेफुज बेग रा. सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड यांचे बरोबर वर दर्शविलेल्या मिळकती बाबत कोणीही खरेदी, विक्री, हस्तांतरण, गहाण, तारण, बक्षीस, ईसारपावती किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करु नये. तसा केल्यास त्याचे खर्चाची व परिणामाची सर्वस्वी जबाबदार ही संबंधीत व्यक्तीवर राहिल याची नोंद घ्यावी. सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येते.

दि. २१/११/२०२६.

जाहिर प्रगटन देणार

१. मोहम्मद हारुण सय्यद

२. आरेफे पिता रईस कुरेशी

मार्फत :-
ॲड.वाय.आर.सय्यद
न्यायालय, परळी वैजनाथ.
मो. क्र. ९९२३१४९७८६.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा परळी वै., जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.व्ही. एन. गायकवाड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६५०/२०२६

चंद्रकला दत्तात्रय वाघमारे व इ. वि.निरंक
(मार्फत ॲड.व्ही.एच.टेकाळे)

अर्जदार -

१. चंद्रकला दत्तात्रय वाघमारे, वय ८० वर्षे धंदा घरकाम, रा.गुरू कृपा नगर, परळी वै. ता.परळी वै. जि.बीड

२. रविंद्र दत्तात्रय वाघमारे, वय ४५ वर्षे धंदा नोकरी, रा.सदर

ज्याअर्थी **मयत चंद्रकला दत्तात्रय वाघमारे, रा.गुरू कृपा नगर, परळी वै. ता. परळी वै. जि. बीड हे/हया दिनांक ०१/०४/२०२६ रोजी परळी वै. ता.परळी वै. जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क.१ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत चंद्रकला दत्तात्रय वाघमारे, रा.गुरू कृपा नगर, परळी वै. ता. परळी वै. जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०२/०१/२०२७

आदेशावरुन,

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी वै.

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी वै.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा परळी वै., जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.व्ही. एन. गायकवाड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६५२/२०२६

गणपत पिता नागनाथअप्पा तोंडारे वि.नील
(मार्फत ॲड.व्ही.बी.खाडे परळी वै.)

अर्जदार -

गणपत पिता नागनाथअप्पा तोंडारे, वय ८३ वर्षे धंदा शेती, रा.नागापूर ता.परळी वै. जि.बीड

ज्याअर्थी **मयत नागनाथ पिता मन्मथ उर्फ मनमत तोंडारे, रा. नागापूर, ता. परळी वै. जि. बीड हे/हया दिनांक १०/०१/१९८९ रोजी नागापूर ता.परळी वै. जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क.१ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत नागनथ पिता मन्मथ उर्फ मनमत तोंडारे, रा.नागापूर, ता.परळी वै. जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०४/०१/२०२७

आदेशावरुन,

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी वै.

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी वै.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | बुधवार दि.२५ नोव्हेंबर २०२६ | पान ३

सहकारमहर्षि माजी खा.स्व.बाळासाहेब पवार यांना अभिवादन सभा

जालना/प्रतिनिधी

जालना सहकारी साखर कारखाना रामनगर, चे संस्थापक माजी खा. बाळासाहेब पवार यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्त रामनगर कारखाना परिसरात एका अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २५ नोव्हें. रोजी स्व. बाळासाहेब पवार यांची २७ वी पुण्यतिथी आहे. १९८० च्या दशकात शेतकऱ्यांना समृद्ध, आर्थिक सक्षम आणि सशक्त करण्याच्या उद्देशाने स्व. बाळासाहेब पवार यांनी या कारखान्याची मुहुर्तमेढ रोवली होती. जालना-बदनापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना संजीवनी देणारा हा कारखाना शेतकऱ्यांसाठी एकमेव आधार होता. अनेक नवयुवक, होतकरू तरुणांच्या हाताला काम देणारा होता. अशा या सहकार महर्ष जालना सहकारी साखर कारखाना रामनगर चे संस्थापक माजी खा. बाळासाहेब पवार यांना दि. २५ नोव्हें. रोजी कारखाना परिसरात सकाळी १० वा. अभिवादन करण्यासाठी एका सभेचे आयोजन करण्यात आले असून यावेळी शेतकरी नेते लक्ष्मणराव वडले यांचे मार्गदर्शन तसेच स्व. बाळासाहेब पवारांच्या कारकिर्दतील कार्याच्या आठवणींना उजाळा देण्यात येणार आहे. या अभीवादन सभेस सर्व कामगार, सभासद, ऊस उत्पादक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जालना - बदनापूर सहकारी साखर कारखाना बचाव कृती समिती आणि अंजलीताई दमानिया समर्थक यांच्या वतीने अंकुशअप्पा देशमुख, अंकुशराव राऊत, कमलाकर अंभोरे, राजेंद्र जैस्वाल, ज्ञानेश्वर भांदरगे, सुभाषराव कोळकर, लक्ष्मण शिंदे, नारायण वाडेकर, कैलास फुलारी, कॉ. प्रल्हाद हेकाडे, प्रल्हाद पडूळ, कृष्णा पडूळ, कारभारी महाराज अंभोरे, सोपानराव भांदरगे, अरुण वडकर, जगन्नाथ काळे, सांडुराम दाभाडे, चंद्रकांत देशमुख, अर्जुनराव भांदरगे, ज्ञानेश्वर देवडे, मारोतराव मदन, शिवाजी शेजुळ, श्रीराम लकडे, ऍड. गोपाळ मोरे, रावसाहेब पवार, अशोक देशमुख आदिंसह कामगार, सभासद, ऊस उत्पादक यांनी केले.

विमा दाव्यात खोटी माहिती दिल्यास भरपाई नाही

सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल, राष्ट्रीय ग्राहक आयोगाचा आदेश रद्द

प्रतिनिधी जालना

विमा नियमांचे उल्लंघन करून खोटी माहिती सादर करणे, मालाच्या नोंदींमध्ये फेरफार करणे आणि संशयास्पद आगीच्या आधारे भरपाई मिळवण्याचा प्रयत्न करणे संबंधित कंपनीला चांगलेच भोवले आहे. अशा प्रकरणांमध्ये विमा कंपनीला संपूर्ण दावा फेटाळण्याचा पूर्ण कायदेशीर अधिकार असल्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांच्या खंडपीठाने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाचा दोन कोटी चाळीस लाख रुपयांची भरपाई देण्याचा आदेश पूर्णपणे रद्दबातल ठरवत 'द न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी'च्या बाजूने निकाल दिला आहे.

नजीबाबाद येथील मे. हेमकूंड ड्युप्लेक्स अँड बोर्ड प्रा. लि. या कागदी पुठ्ठा निर्मिती करणाऱ्या कारखान्यातील मोकळ्या आवारात आणि पत्र्याच्या शेडमध्ये ७ मे २००९ रोजी दुपारी आग लागली होती. या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणावर कच्चा माल जळून खाक झाल्याचा दावा करत कंपनीने सुरुवातीला कोट्यवधी रुपयांची मागणी केली, जी नंतर सुधारित करून सात कोटी एकतीस लाख रुपये इतकी करण्यात आली. मात्र, विमा कंपनीने नियुक्त केलेले प्राथमिक सर्वेक्षक, अंतिम सर्वेक्षक आणि स्वतंत्र तपास संस्था यांच्या अहवालात अनेक धक्कादायक व संशयास्पद बाबी समोर आल्या. घटनास्थळी विजेची जोडणी नव्हती, आग लागल्याची माहिती अग्निशामक दलाला तब्बल एक तास उशिराने देण्यात आली आणि आग विझवण्यासाठीही कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून कोणतेही प्रामाणिक प्रयत्न झाले नाहीत.

तपासात उघड झाले की, ज्या पत्र्याच्या शेडमध्ये आग लागली, ती शेड आगीपूर्वीच माती खोदण्याच्या यंत्राच्या साहाय्याने पाडण्यात आली होती. तसेच, तिथे कोणताही वापरण्याजोगा कच्चा माल नसून केवळ अनेक वर्षांपासून पडून असलेला निरुपयोगी कचरा व भंगार साठवलेले होते. कंपनीने आपल्या जमाखर्चाच्या हिशेब नोंदवहीत केवळ कागदोपत्री खोटा साठा दाखवून विम्याची मोठी रक्कम लाटण्याचा प्रयत्न केला होता. या कारणावरून न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनीने विमा नियमांचे उल्लंघन झाल्याचे नमूद करत दावा फेटाळला होता. तरीही राष्ट्रीय ग्राहक आयोगाने परीक्षकांचे वस्तुनिष्ठ अहवाल दुर्लक्षित करून विमा कंपनीला दोन कोटी चाळीस लाखांची भरपाई देण्याचे निर्देश दिले होते.

सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि कागदपत्रे तपासल्यानंतर ग्राहक आयोगाचा निर्णय अत्यंत चुकीचा असल्याचे स्पष्ट केले. अधिकृत परीक्षकांचा तांत्रिक अहवाल योग्य पुराव्याशिवाय फेटाळता येत नाही आणि विमाधारकाने खोटी माहिती देऊन दावा फुगवून मागितल्यास संपूर्ण विमा दावा नाकारण्याचा अधिकार विमा कंपनीला आहे, असे स्पष्ट करत न्यायालयाने ग्राहक आयोगाचा आदेश रद्द केला आणि संबंधित कारखान्याची याचिका फेटाळून लावली.

विमा करारातील प्रामाणिकतेचा सन्मान करणारा निकाल : विधीज्ञ महेश धनावत

''हा निकाल विमा कायद्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण व दिशादर्शक ठरणारा आहे. विमा हा परम विश्वासाच्या तत्त्वावर आधारलेला करार असतो. केवळ मोठा विमा उतरवला म्हणून खोटी कागदपत्रे किंवा बनावट साठ्याच्या नोंदी दाखवून विम्याची रक्कम उकळता येत नाही. घटनास्थळावरील खरी वस्तुस्थिती आणि परीक्षकांचा वैज्ञानिक व तांत्रिक तपास अहवाल दुर्लक्षित करता येणार नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा ठळकपणे अधोरेखित केले आहे.

सदरील माहिती जालनाचे प्रसिद्ध विधीज्ञ महेश धनावत यांनी दिली आहे.

महेश सारणीकर यांना राज्यस्तरीय 'उद्यम सह्याद्री पुरस्कार २०२६' प्रदान!



जालना/प्रतिनिधी

व्यावसायिकता, उद्यमशीलता आणि सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत माहिती अधिकार पत्रकार संरक्षण आणि पोलिसमित्र समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष, सिलिकॉन सिस्टिम्सचे संस्थापक संचालक, कै. तात्यासाहेब पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र ब्राह्मण सभेचे राज्य सचिव आणि दैनिक दक्षवेधचे मुख्य संपादक महेश बळवंतराव सारणीकर यांना प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय 'उद्यम सह्याद्री पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. उद्यम इन्फो सोल्युशन्स प्रा. लि., छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात आला.

दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील आईनस्टाईन हॉल, महात्मा गांधी विद्यापीठ, सिडको एन-६ येथे आयोजित समारंभात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी नामांकित उद्योजक, संचालक, देवगिरी इलेक्ट्रॉनिक क्लस्टर, मनू इलेक्ट्रीकल्स, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि शासकीय तंत्रनिकेतन आणि आयटीआयचे शैक्षणिक समिती सदस्य डॉ. व्ही.एस. देवळणकर तसेच नवयुग इंजिनिअर्स आणि पेंटागॉन इंडस्ट्रीज, एमआयडीसी, अहिल्यानगरचे संचालक संजय पारनाईक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

उद्यम इन्फो सोल्युशन्सचे संस्थापक संचालक उल्हास भाले, संचालिका सौ. दीपा भाले, कार्यक्रम समन्वयक तुषार जहागीरदार, श्रेयस आपटे, हर्षित राजहंस, सुरभी देशपांडे यांच्यासह अनेक उद्योजकांची उपस्थिती होती.

माळीपुऱ्यात सापळा रचून एकाला बेड्या; ४५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

जालना/ज्ञानेश्वर साळुंके

जालना शहरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी मोहीम तीव्र केली असून, कदीम जालना पोलिसांनी माळीपुरा परिसरात मोठी कारवाई केली आहे. गावठी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस जवळ बाळगून फिरणाऱ्या संशयिताला पोलिसांनी रंगेहाथ ताब्यात घेतले. नाजिम अय्युब शेख (वय ४०, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर) कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे आणि तपास पथक पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत होते. यावेळी माळीपुरा परिसरात एक व्यक्ती बेकायदेशीररीत्या गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस बाळगून फिरत असल्याची खात्रीशीर माहिती गोपनीय बातमीदाराकडून पोलिसांना मिळाली.

मिळालेल्या माहितीची तात्काळ दखल घेत, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने माळीपुरा परिसरात सापळा रचला. संशयास्पद हालचाली करणाऱ्या नाजिम शेख याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे ४५ हजार रुपये किमतीचे एक गावठी बनावटीचे पिस्तूल आणि ५०० रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस असा एकूण ४५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९०/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा



कलम ३ सह २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या पथकाने केली कारवाई :

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सदा राठोड, सचिन चौधरी, धनाजी कावळे, पोलीस कॉन्स्टेबल मतीन शेख, दिलीप गायकवाड आणि इम्रान खान यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. या प्रकरणाचा पुढील तपास कदीम जालना पोलीस करत आहेत.

सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना २५ हजारांचे कन्यादान अनुदान

जालना/जिमाका

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊन विवाह करणाऱ्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील दाम्पत्यांसाठी कन्यादान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र वधूच्या वडिलांच्या, आईच्या किंवा पालकांच्या नावे २५ हजार रुपयांचे अनुदान क्रॉस चेकद्वारे देण्यात येते.

तसेच सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक पात्र जोडप्यामागे ४ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते. योजनेचा लाभ घेण्यासाठी वराचे वय २१ व वधूचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे, अशी अट आहे.

सन २०२६-२७ या वर्षासाठी सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यास इच्छुक असलेल्या जास्तीत जास्त स्वयंसेवी संस्थांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. योजनेच्या अर्थसहाय्यासाठी अर्जाचा नमुना संबंधित कार्यालयात उपलब्ध असून, इच्छुक संस्थांनी तो प्राप्त करून प्रस्ताव सादर करावा. पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक अविनाश बहिर यांनी केले आहे.

जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीवर अशासकीय सदस्य निवडीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

जालना/जिमाका

राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक स्तरावरील समस्या तातडीने सोडविण्यासाठी राज्य शासनाच्या निर्णयानुसार जालना जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्यात येत आहे. या समितीवर जिल्ह्यातील अल्पसंख्याकांसाठी कार्य करणाऱ्या तीन नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची निवड करण्यात येणार असून, त्यासाठी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

शासन निर्णय दि. १५ एप्रिल २०१७ व दि. १९ जानेवारी २०२६ अन्वये ही समिती गठीत करण्यात येत आहे. या समितीवर अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशन शासनास पाठविण्यासाठी जिल्हास्तरावर प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या इच्छुक प्रतिनिधींनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावेत. अर्जामध्ये अर्जदाराचे संपूर्ण नाव, पत्ता, जन्म दिनांक, व्यवसाय, शैक्षणिक पात्रता, मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याची सविस्तर माहिती नमूद करणे आवश्यक आहे.

इच्छुक सदस्यांनी आपले परिपूर्ण अर्ज दिनांक ४ डिसेंबर २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शाळेच्या पहिल्याच दिवशी शिक्षकांच्या वेळेचा बोजवारा!

मुख्याध्यापकांसह सहशिक्षकाला कारणे दाखवा नोटीस; तीन दिवसांत खुलासा मागितला!

मंठा/प्रतिनिधी

शाळेतील शिक्षकांनी वेळेवर उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन व शैक्षणिक कामकाज सुरळीत पार पाडणे अपेक्षित असताना, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या द्वितीय सत्राच्या पहिल्याच दिवशी शिक्षकांच्या उशिरा उपस्थितीचा प्रकार समोर आला आहे. मंठा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केहाळ वडगाव येथील मुख्याध्यापकांसह एका सहशिक्षकाच्या उपस्थितीबाबत शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी तक्रार केल्यानंतर गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने दोघांनाही स्वतंत्र कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या कारवाईमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी शैक्षणिक वर्षाच्या द्वितीय सत्राचा पहिला दिवस होता. या दिवशी शाळेतील शिक्षकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र, मुख्याध्यापक श्री. भुस्कुटे डी. डी. आणि सहशिक्षक श्री. के. एम. कांबळे हे शाळेत निर्धारित वेळेत उपस्थित नसल्याबाबत शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी पंचायत समिती मंठा येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे तक्रार केली.

या तक्रारीची दखल घेत गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दोघांनाही स्वतंत्र कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. मुख्याध्यापकांना बजावलेल्या नोटीसमध्ये शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांच्या विलंबाने उपस्थितीबाबत तक्रार केल्याचा उल्लेख आहे. तसेच मुख्याध्यापक म्हणून आपल्या कर्तव्यपालनाबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तर सहशिक्षक व्ही.एम. कांबळे यांना बजावलेल्या नोटीसमध्ये शाळेत नेमक्या कोणत्या वेळी उपस्थित झाला, विलंबाने उपस्थित राहण्यामागील कारणे काय होती, याबाबत स्पष्ट लेखी खुलासा मागविण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, मुख्याध्यापक आणि सहशिक्षक या दोघांनाही नोटीस प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत वस्तुस्थिती व कारणांसह लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विहित मुदतीत खुलासा न केल्यास किंवा तो असमाधानकारक आढळल्यास नियमानुसार पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशाराही गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने दिला आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा प्रश्न ऐरणीवर!

शाळेच्या पहिल्याच दिवशी शिक्षकांच्या उपस्थितीबाबत तक्रार होणे ही बाब शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. शिक्षक वेळेवर उपस्थित नसतील तर विद्यार्थ्यांचे अध्यापन, शैक्षणिक नियोजन आणि शाळेतील प्रशासकीय कामकाजावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्याध्यापक हे शाळेचे प्रमुख असल्याने त्यांच्या उपस्थितीला आणि जबाबदारीला विशेष महत्त्व आहे.

दरम्यान, गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने तातडीने दखल घेत दोघांनाही नोटीस बजावल्याने शाळेतील उपस्थितीच्या प्रश्नावर प्रशासन कितपत गांभीर्याने कारवाई करते, हे स्पष्ट झाले आहे. मात्र, संबंधित शिक्षकांच्या खुलाशातून नेमकी वस्तुस्थिती काय समोर येते आणि त्यानंतर शिक्षण विभाग कोणती भूमिका घेतो, याकडे ग्रामस्थ व पालकांचे लक्ष लागले आहे.

शाळा ही विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे मंदिर आहे. त्यामुळे शिक्षकांची वेळेवर उपस्थिती ही केवळ प्रशासकीय औपचारिकता नसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काशी निगडित जबाबदारी आहे. आता नोटीस बजावण्यापुरतीच कारवाई मर्यादित राहणार की पुढे प्रत्यक्ष शिस्तभंगाची कारवाई होणार, हा खरा प्रश्न आहे.

ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे मुख्यालय नेमके कुठे? उपस्थितीचे वेळापत्रक देण्यास प्रशासनाची टाळाटाळ!

अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि उपस्थिती लपवता कशासाठी? संभाजी ब्रिगेड आक्रमक; आंदोलनाचा इशारा!

मंठा/प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची ग्रामपंचायतीनिहाय नियुक्ती, मुख्यालयाचे गाव आणि आठवड्यानुसार उपस्थितीचे अधिकृत वेळापत्रक मिळावे, यासाठी संभाजी ब्रिगेड मंठाच्या वतीने गटविकास अधिकारी, पंचायत समिती मंठा यांना अंतिम पुनर्निवेदन देण्यात आले.

यापूर्वी दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी अर्ज सादर करण्यात आला होता. त्यानंतर पंचायत समितीने १६ सप्टेंबर, ५ ऑक्टोबर व १३ ऑक्टोबर रोजी निर्देश दिले होते. तसेच १३ नोव्हेंबर रोजी सविस्तर निवेदन देऊनही आजपर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध झाली नसल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे.

वारंवार पाठपुरावा करूनही अर्धवट माहिती मिळणे आणि वरिष्ठ कार्यालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी न होणे ही गंभीर प्रशासकीय बाब असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

या अंतिम पुनर्निवेदनाद्वारे मंठा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची नियुक्ती, मुख्यालयाचे गाव व आठवड्यानुसार उपस्थितीचे संपूर्ण वेळापत्रक लेखी स्वरूपात उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच माहिती सादर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार प्रशासकीय कारवाई करावी आणि यापूर्वीच्या सर्व पत्रांवर झालेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

अंतिम पुनर्निवेदनानंतरही माहिती उपलब्ध करून न दिल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने पंचायत समिती, मंठा कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा तालुकाध्यक्ष शिवश्री बाळासाहेब खवणे यांनी दिला आहे.

मत्स्योदरी अध्यापक महाविद्यालयात सांस्कृतिक स्नेहसंमेलन उत्साहात

जालना/प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत मत्स्योदरी अध्यापक महाविद्यालयात बी.एड. द्वितीय वर्षाच्या छात्राध्यापकांनी आयोजित केलेले सांस्कृतिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विविध प्रांतांच्या वेशभूषा, गीत, नृत्य आणि सांस्कृतिक सादरीकरणांतून छात्राध्यापकांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वडजे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. मंगेश ढोबळे उपस्थित होते. तसेच प्रा. डॉ. जयनारायण रेगुडे, प्रा. डॉ. कावेरी डहाळे, प्रा. गुजर आणि प्रा. जोशी यांची उपस्थिती होती.



कवयित्री छात्राध्यापिका शीतल भोईटे यांनी प्रभावी शैलीत सूत्रसंचालन केले.

प्रा. डॉ. जयनारायण रेगुडे आणि छात्राध्यापिका श्रीदेवी सूर्यवंशी यांनी सादर केलेले शिवस्तुतीपर पोतराज गीत कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. त्यांच्या दमदार सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. मंगेश ढोबळे यांनी सांस्कृतिक उपक्रमांमुळे भावी शिक्षकांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सर्जनशीलता व संघभावना विकसित होते, असे सांगितले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. वडजे यांनी छात्राध्यापकांच्या नियोजनाचे व कलागुणांचे कौतुक केले.

latur:Layout 1 11/25/2026 1:21 AM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

लातूर जिल्हा आवृत्ती | बुधवार , दि.२५ नोव्हेंबर २०२६ | पान नं.४

आयुष्मान भारत मिशन समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा लातूर दौरा

'आरोग्य संवाद यात्रा' व योजनांचा आढावा

लातूर/प्रतिनिधी

राज्य शासनाच्या आयुष्मान भारत मिशन मितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश स. शेटे हे बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. डॉ. शेटे यांचे २५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन होईल. त्यांच्या उपस्थितीत एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची आढावा बैठक होणार आहे. त्यानंतर पत्रकार परिषदेचे होईल. सायंकाळी ४ वाजता लातूर शहरातील अंबाजोगाई रोड येथील येलाले हॉस्पिटलला भेट देऊन पाहणी करतील. यंकाळी ५ वाजता वाजता औसा तालुक्यातील भादा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला देतील.

तावरजाचे पाणी चोरीला?...लोकप्रतिनिधी आणि आधिकरीही गप्प!!

टंचाईच्या काळात भादेकरांच्या तोंडचे पाणी अडवणारा कोण आहे तो शेतकरी...

औसा/प्रतिनिधी

तालुक्यातील भादा येथे पाण्याच्या तीव्र टंचाईचा सामना करावा लागत होता म्हणून भाजप पंचायत समिती गणाचे सदस्य यांनी लातूरचे खासदार डॉ शिवाजीराव काळगे यांच्याकडे वारंवार जावून भादेकरांच्या पाणी प्रश्नावर कायम मार्ग काढण्यासाठी जावून भादेकर भूमिपुत्र तथा पंचायत समिती सदस्य किशोर जवंजाळे,भावी सरपंच आर टी शिंदे व इतर कार्यकर्ते यांनी पाच खेडी योजना कार्यान्वित करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले आणि त्यावर पूर्वीचे अंदाजे ३२ लाख रुपये विज वितरण कंपनीचे असलेले थकीत बिल माफ करण्यात आले.आणि योजना मोठ्या प्रयत्नाने ती योजना कार्यान्वित करण्यासाठी परवानगी देण्यात आली. परंतु ही यंत्रणा कार्यान्वित झाले पासून या भागातील काही शेतकरी या पाईपलाईन वर असलेल्या वॉलद्वारे तो पूर्णपणे काढून त्याचे पाणी शेतीसाठी वापरत असल्याची चर्चा सध्या जोरदार सुरू असून ती चर्चा खरी किंवा खोटी परंतु गावासाठी पाणीपुरवठा करणारी यंत्रना ही सक्षम असणे आवश्यक आहे.जेणेकरून गावाच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार नाही परंतु याच यंत्रणेला आर्थिक देवाणघेवाणीतून आपलेसे केले जात असल्याची चर्चा असून ती कितपत खरी आहे? हे पोलीस प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करून काढणे आवश्यक आहे.कारण टंचाईच्या काळामध्ये गावच्या पाणीपुरवठा



योजनेसाठी येणारे पाणी कोणता तरी शेतकरी राजरोस पणे अडवून घेतोय ? ही बाब अत्यंत चिंताजनक खेदजनक असून तो शेतकरी इतका भारी की ()आहे काय? हे जो पाणीटंचाईच्या काळामध्ये गावच्या तोंडचे पाणी पळवतो?आणि कोणत्याही स्थानिक ते जिल्हास्तरीय पुढाऱ्यापर्यंत तसेच प्रशासनातील कोणत्याही अधिकाऱ्यांना घाबरत नाही? आणि तो पाण्याची बिनदिक्कतपणे वॉल फिरवून पाण्याची चोरी करतोय ?याला आळा कधी बसणार आणि भादेकरांना मुबलक पाणी कधी मिळणार ? **हा प्रश्न सध्या भादेकरांना सतावतोय...**सदरील पाणीपुरवठा योजनेचे पाणी वापरणारा कोण शेतकरी आहे त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल आणि तो जो लिकेज व्हॉल्व आहे त्याचा कायम बंदोबस्त करण्यासाठी वेल्डिंगद्वारे तो मजबूत पणे कायम बंद करण्यात येईल असे सदरील प्रतिनिधीने अधिक चौकशी केली असता भादा पंचायत समिती सदस्य किशोर जवंजाळे यांनी सांगितले...**(चौकट) सदरील पाणीपुरवठा योजनेचे पाणी घेणारा शेतकरी कोण आहे?त्याच्यावर योग्य कार्यवाही झाली पाहिजे याकरिता भादा प्रशासक,ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी उद्याच चर्चा करून योग्य ती कार्यवाही केली जाईल असे पद्माकर चिंचोलकर,भारतीय जनता पार्टी राज्य सदस्य रा.भादा तालुका औसा यांनी सदरील प्रतिनिधीशी बोलताना सांगितलेशी केली असता भादा पंचायत समिती सदस्य किशोर जवंजाळे यांनी सांगितले...**(चाआर्थिक देवाणघेवाणीतून आपलेसे केले जात

पोखरा योजना नावालाच;लाभ नाही कोण्या शेतकऱ्याला कृषी विभागाच्या दिरंगाईने शेतकरी त्रस्त!

वर्षभरापूर्वी ऑनलाइन अर्ज; तरीही मंजुरी मिळेना? लाभार्थ्यांचा सवाल अर्ज करूनही लाभ कधी मिळणार?

औसा/प्रतिनिधी :

शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढविणे,शेतीला आधुनिकतेची जोड देणे आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे या उद्देशाने शासनाकडून पोखरा योजना राबविण्यात येत आहे. मात्र, औसा तालुक्यात या योजनेच्या अंमलबजावणीबाबत कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वर्षभरापूर्वी ऑनलाइन अर्ज करूनही अनेक लाभार्थ्यांच्या फाईल्स पुढे सरकत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.ऑनलाइन अर्ज, कागदपत्रांची पूर्तता आणि आवश्यक प्रक्रिया पूर्ण करूनही कृषी विभागाकडून पुढील कार्यवाही होत नसल्याची लाभार्थ्यांची तक्रार आहे. अर्जाची सद्यस्थिती काय, फाईल कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे आणि लाभ कधी मिळणार, याबाबत शेतकऱ्यांना स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने कृषी विभागाच्या कारभाराबाबत नाराजी वाढत आहे.शासन एकीकडे शेतकऱ्यांसाठी विविध योजनांची जाहिरात करते, ऑनलाइन अर्ज मागवते; मात्र अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर वेळेत कार्यवाही करण्याची



जबाबदारी कोणाची? वर्षभर फाईल प्रलंबित ठेवण्यामागचे नेमके कारण काय? कृषी विभागाकडे मनुष्यबळाचा अभाव आहे की प्रशासकीय उदासीनता? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.विशेष म्हणजे, शेतकऱ्यांनी वेळेत ऑनलाइन अर्ज करायचा, कागदपत्रांची पूर्तता करायची आणि त्यानंतर लाभासाठी वर्षभर प्रतीक्षा करायची, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कृषी विभागाच्या संथ कार्यपद्धतीचा फटका थेट लाभार्थी शेतकऱ्यांना बसत आहे.कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालून पोखरा योजनेतील प्रलंबित अर्जांचा आढावा घ्यावा. कोणत्या स्तरावर किती फाईल्स प्रलंबित आहेत, त्यामागील कारणे काय आहेत आणि त्यांचा निपटारा कधी होणार, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी लाभार्थी शेतकऱ्यांतून होत आहे.*कृषी विभागाचा कारभार नेमका कोणासाठी?शेतकऱ्यांनी अर्ज करून वर्ष उलटले, तरी फाईल पुढे सरकत नसेल तर योजनांच्या ऑनलाइन प्रक्रियेचा उपयोग काय? कृषी विभागाने केवळ अर्ज स्वीकारण्यापुरती भूमिका न ठेवता पात्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याची जबाबदारी पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.एक वर्ष झाले स्पींकलर आँनलाईन अर्ज केले आहे परंतु आजपर्यंत काय झाले समजले नाही.पोखरा योजनेचा आमच्या गावात लाभ वर्षभरात कुणाला मिळाला हे सांगता येत नाही. पोखरा योजना असून उपयोग काय?. वेळेवर कोणतेही लाभ मिळत नाही.अशा प्रतिक्रिया शेतकऱ्याकडून येत आहेत.

लातूर शहर जिल्हा काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी जाहीर

उपाध्यक्ष १०, सरचिटणीस २१ तर ५ संघटकांचा समावेश

लातूर /प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने,माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार अमितविलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे व माजी आमदार तथा लातूर जिल्हामध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांच्या सूचनेनूसारलातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. शिवाजी जवळगेकर यांनी लातूर शहरजिल्हा काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी दि. २१ नोव्हेंबर रोजी जाहीर केली.ही कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे.उपाध्यक्ष दगडूअप्पा मिटकरी, बसवंत अप्पा भरडे, अमर राजपूत , राजकुमारजाधव, लक्ष्मीकांत मंठाळे, नामदेव इगे , सत्तारभाई शेख, सतीश कानडे,भालचंद्र सोनकांबळे, पांडुरंग नामदेव देडे, सरचिटणीस- पृथ्वीराज शिरसाट,युनूस मोमीन, दत्ता सोमवंशी, अयुब मणियार, मोहन सुरवसे, रफिक सय्यद,बालाजी मुस्कावाड, केशरबाई महापुरे, सिकंदर पटेल, व्यंकटेश पुरी, अल्ताफमेहबूब शेख, प्रवीण घोटाळे, सुभाष पंचाक्षरी, प्रभुदास दुसे, रमेशथोरमोटे पाटील, विकास वाघमारे, निसार पटेल, भालचंद्र येडवे, अँड फारुखशेख, सत्यवान कांबळे, संजय ओव्हळ कार्यालय प्रमुख/सरचिटणीस अँड.देवीदास बोरुळे पाटील, संघटक सूर्यकांत कातळे, शेख कलीम बादल (लालूभाई), अँड. गोपाळ बुरबुरे, अँड. अजित चिखलीकर मंगेश दिलीप सोनकांबळे,सचिव धनराज पाटील, शिवाजी देशमुख, विजयकुमार धुमाळ, विकास माडकर, अशोकसूर्यवंशी, मुश्ताक पटेल, वीरेंद्र सौताडेकर, शैलेश भोसले, जगन्नाथपाटील, सतीष हलवाई, आबेद गोलंदाज, जाकेर हूसेन बागवान, सतीश साळुंके,कुमारअप्पा पारशेट्टी, मनोज देशमुख, डॉ. रईसखान पठाण, असिफ बागवान, पंडितकावळे ,गणेश सुभाषराव देशमुख, निजाम मोईजोद्दिन शेख, गोविंद ठाकूर,लक्ष्मीनारायण नावंदर, अजय पाटील, अविनाश बट्टेवार, सौ. कविता वाडीकर,अजीज ,बागवान, राजू राठोड, काशिनाथ बळवते, इसरार पठाण, रमाकांत गडदे,राजू उटगे, अँड. संजय सितापुरे, शफी टाके, डॉ. जयदेव मोहिते, श्यामबरुरे, अँड. सचीन पांचाक्षरी, रत्नदीप अजनिकर, राजा माने, अमित जाधव,राजू गवळी, अँड. अतिश चिकटे, इनायत सय्यद,मनोज चखले, अनूप मलवाड, शिवाप्पा कोरके, अकबर माडजे, प्रवीण कांबळे, सो.शिला वाघमारे, श्रीमती शितल मोरे, बप्पा मारडीकर, आबेद गोलंदाज, बालाजीपाडे-पाटील, विकास कांबळे, श्रीमती छायाताई सूर्यवंशी, अँड. सुनीतखंडागळे, श्रीमती वर्षा मस्के, सो. मिनाताई सूर्यवंशी, बाळासाहेबदेशपांडे, अँड. अंगद सूर्यवंशी, अमोल शिंदे, अँड. किसन शिंदे, जालीधरबरडे, शैलेश बोड्नवाड, रोहित दयाळ, आनंद वैरागे, सुलेखा कारेपुरकर, गिरीशजाधव, अँड. बाळासाहेब कटके, रईस टाके, डॉ. बालाजी सोळंके, महेश काळे,अँड. अंगद गायकवाड, हमीद बागवान, श्रीकांत ठोंबरे, अभिषेक पतंगे, अँड.शरद देशमुख, लक्ष्मन गणपतराव मोरे, जीवन सुरवसे, योगेश उमाकांत स्वामी,फैजलखान कायमखानी, भाऊसाहेब भडीकर, सौ. अँड. सुनंदा मोटे-इंगळे, मोहसिनकादरी सय्यद.सहसचिव गोविंद मदने, असिफ गोलंदाज शेख, अल्लाबक्ष जाफरसाब, तुषारअग्रवाल, बालाजी सोनटक्के, मनोज अरुण थोरात, जफर पटवेकर, हरिदास मगर,नीतीन कांबळे, कुणाल येळीकर, शेख अरिफ, जितेंद्र गुळवे, श्रीकृष्ण कावळे,सुरेश काशीनाथ गायकवाड, नबी सय्यद नळेगावकर, अजय वागद्रे, चंद्रमणीकांबळे, हिराचंद सितापुरे, नारायण साठे, पवन गायकवाड, फारुख भाई शेख,श्रीकांत गर्जे, बालाजी झिपरे, महेश कोळे, राजकुमार पिटले, श्रावण मस्के,रशीद शेख, अब्बू भाई मणियार, इब्राहीम बाबा शेख, तनुजा कांबळे, अभिजितइगे, अँड. गणेश कांबळे, पवन सोलंकर, एम. एच. शेख, पिराजी साठे,श्रीशैल्य गडगडे, अरफात खान, अखिल शेख, श्रीदेवी रसाळ, युनूस शेख, अब्बूचाऊस, आकाश मगर, नरसिंग कांबळे, सिराज शेख, सुशील खरोसे, धनराज गायकवाड,प्रमोद जोशी, विकास कांबळे, जमालुद्दीन मणियार, असलम शेख, ईस्माईल शेख,आकाश खैरमोडे, बालाजी अंकलकोटे, महेश शिंदे, मनदीप सवई, संतोष पोतदार,दिलीप गायकवाड, विकास धायगुडे, मुफ्तार शेख, आनंद सुरवसे, अँड.,विजयगायकवाड, नारायण कांबळे, प्रा. धरणे, बस्वराज विश्वनाथ, राजेश गुंठे,सलीम शेख, रहिम शेख, हारून शेख, असलम चाऊस, बब्रुवान गायकवाड, जाकीरसय्यद, समीर शेख,अँड अभय सोनवणे, अँड. सचिन कदम, निजाम शेख, सय्यद सादिक.विशेष कार्यकारी सदस्य जयश्री, भालचंद्र सोनकांबळे, अँड. स्नेहल उटगे,अँड. दीपक सूळ, प्रा. डॉ. स्मिता खानापुरे, सचिन बंडापल्ले, कैलाशकांबळे, विजयकुमार साबदे, अशोक गोविंदपूरकर, अँड. समद पटेल, अँड. करणजाधव, बाळासाहेब देशमुख, सपना बंडू किसवे, गोरोबा लोखंडे, अहमदखान पठाण,निमंत्रित सदस्य अशोक भोसले, मोहन माने, प्रा. माधव गादेकर, गणपतरावबाजुळगे, रमेश बियाणी, अशोक (गट्टू) अग्रवाल, राम कोंबडे, अँड. मधुकरराजमाने, चाँदपाशा इनामदार, रमेशसिंह बिसेन, अजगर पटेल, संजय निलेगावकर,शेख जानी हसन, प्रा. सुधीर अनवले, फकरोद्दीन पटेल, खजिनदार अँड. प्रशांतवि. जाधव यांचा समावेश आहे.

आ. कराड यांच्या प्रयत्नातून महावितरणच्या भादा कार्यालयास २६ गावे पूर्ववत जोडली

लातूर/प्रतिनिधी

दि. २४- महावितरणच्या प्रशासकीय पुनर्रचनेअंतर्गत मुरुड उपविभागामध्ये समाविष्ट करण्यात आलेली २६ गावे लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे भादा शाखा कार्यालय औसा उपविभागाशी तांत्रिक व प्रशासकीय कामकाजासाठी जोडण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा शाखा कार्यालय व त्या अंतर्गत असलेली गावे डिसेंबर २०२१ मध्ये मुरुड उपविभागात समाविष्ट



करण्यात आली होती. यामुळे वीज ग्राहकांना उपविभागीय कार्यालयाचे अंतर गैरसोयीचे असल्याने मोठा असंतोष निर्माण झाला होता. सदरील गावे भादा शाखा कार्यालयास कायम ठेवावी अशी मागणी आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडे नागरिकांनी केली होती. जनतेची गैरसोय आणि अडचण आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांना लेखी निवेदन देऊन त्याचबरोबर संबंधित अधिकाऱ्याकडे सातत्याने महावितरणच्या भादा कार्यालयाशी गावे संलग्न पूर्ववत जोडण्याची मागणी केली होती. आ.कराड यांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीने भादा शाखा कार्यालयांतर्गत येणाऱ्या २६ गावांच्या प्रशासकीय कार्यक्षेत्राची पुनर्रचना करण्यात आली आहे. या पुनर्रचनेनुसार बेलकुंड शाखेला टेंभी, शिंदाळा, शिंदाळावाडी, शिराळवाडी, येल्लोरी व रिंगणी ही ५ गावे, औसा दक्षिण शाखेला वानवडा व सत्तधारवाडी ही २ गावे तर उजनी शाखेला टाका, बिलवरी व शिवली ही ३ गावे जोडण्यात येणार आहेत. उर्वरित १६ गावे भादा शाखेतच कायम ठेवून भादा शाखा तांत्रिक व प्रशासकीय बाबीकरिता औसा उपविभागास जोडण्यास मंजुरी दिली आहे.भादा सर्कल मधील गावे ३३/११ केव्ही शिवली उपकेंद्र उजनी शाखेस, तर वानवडा उपकेंद्र औसा दक्षिण शाखेशी जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे वीज ग्राहकासह नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून भादा शाखा कार्यालयास सलग्न असलेली गावे पूर्ववत जोडून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचे भादा सर्कल मधील विविध गावच्या कार्यकर्त्यांसह वीज ग्राहक आणि जनतेने आभार व्यक्त केले आहेत.

महापरिनिर्वाण दिनाचे पावित्र्य राखण्यासाठी पानगाव चैत्यभूमी परिसरात मनोरंजनात्मक वस्तूंच्या विक्रीवर बंदी घालण्याची मागणी

भिम आर्मीचे महाराष्ट्र राज्य सचिव अक्षय धावारे यांचे तहसीलदारांना निवेदन

लातूर/संतोष सोनवणे

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६ डिसेंबर हा महापरिनिर्वाण दिन देशभरात अत्यंत श्रद्धेने, आदराने आणि शोकभावनेतून पाळला जातो. या दिवशी पानगाव येथील चैत्यभूमी परिसरात मोठ्या संख्येने अनुयायी व आंबेडकरप्रेमी अभिवादन करण्यासाठी उपस्थित राहतात. या पवित्र दिवसाचे गांभीर्य आणि चैत्यभूमी परिसराचे पावित्र्य अबाधित राहावे, यासाठी भिम आर्मी भारत एकता मिशनचे महाराष्ट्र राज्य सचिव अक्षय धावारे यांनी रेणापूर तहसीलदार व गटविकास अधिकारी रेणापूर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक ट्रस्ट पानगाव ग्रामपंचायत कार्यालय पानगाव पोलिस निरीक्षक रेणापूर पोलीस उपअधीक्षक चाकुर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. दरवर्षी महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी परिसरात काही विक्रेत्यांकडून भोंगे, पुंग्या, शिट्ट्या, कार्टून, विविध प्रकारचे मास्क, खेळणी तसेच इतर मनोरंजनात्मक वस्तूंची विक्री केली जाते. त्यामुळे या पवित्र परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त होते. हा प्रकार महापरिनिर्वाण दिनाच्या श्रद्धा, शोकभावना आणि गांभीर्याला बाधा आणणारा असून भिवादनासाठी



येणाऱ्या अनुयायांच्या भावनांचाही विचार होणे आवश्यक आहे.त्यामुळे ६ डिसेंबर रोजी चैत्यभूमी परिसरात भोंगे, पुंग्या, शिट्ट्या व मोठ्या आवाजाच्या वस्तू तसेच कार्टून, मास्क, खेळणी आणि इतर मनोरंजनात्मक वस्तूंच्या विक्रीवर प्रतिबंध घालण्यात यावा. अनधिकृत दुकाने व स्टॉल लावण्यास प्रतिबंध करून परिसरात शांतता आणि शिस्त राखण्यासाठी महसूल विभाग, पोलीस प्रशासन व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी अक्षय धावारे यांनी केली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे पावित्र्य जपणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आमचा कोणत्याही विक्रेत्याच्या रोजगाराला विरोध नसून, या ऐतिहासिक आणि श्रद्धेच्या दिवसाचे गांभीर्य टिकवून ठेवणे हाच या निवेदनामागील मुख्य उद्देश असल्याचे अक्षय धावारे यांनी स्पष्ट केले.प्रशासनाने या मागणीची अनधिकृत दुकाने व स्टॉल लावण्यास प्रतिबंध करून परिसरात शांतता आणि शिस्त राखण्यासाठी महसूल विभाग, पोलीस प्रशासन व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी अक्षय धावारे यांनगांभीर्याने दखल घेऊन ६ डिसेंबरपूर्वीच आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी भिम आर्मी भारत एकता मिशनचे महाराष्ट्र राज्य सचिव अक्षय धावारे यांनी केली आहे या वेळी भिम आर्मी जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे जिल्हा सचिव बबलू शिंदे जिल्हा कार्याध्यक्ष बबलू गवळे जिल्हा संघटक समाधान कांबळे जिल्हा सह संघटक अतुल सोनकांबळे रेणापूर तालुका अध्यक्ष अजय कांबळे बब्बी भाई कांबळे आदित्य कांबळे गणेश कांबळे आदी उपस्थित होते

आयुष्मान भारत मिशन समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा लातूर दौरा

'आरोग्य संवाद यात्रा' व योजनांचा आढावा

लातूर, दि. २४ : राज्य शासनाच्या आयुष्मान भारत मिशन समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश स. शेटे हे बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. डॉ. शेटे यांचे २५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन होईल. त्यांच्या उपस्थितीत एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची आढावा बैठक होणार आहे. त्यानंतर पत्रकार परिषदेचे होईल. सायंकाळी ४ वाजता लातूर शहरातील अंबाजोगाई रोड येथील येलाले हॉस्पिटलला भेट देऊन पाहणी करतील. सायंकाळी ५ वाजता वाजता औसा तालुक्यातील भादा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला देतील.

शासकीय कार्यालयांतील व्हॉट्सॲप वेबच्या वापराबाबत गृह मंत्रालयाचा सतर्कतेचा इशारा

* **गोपनीय शासकीय माहितीच्या देवाणघेवाणीसाठी व्हॉट्सॲप वेबचा वापर टाळा**
* **अनधिकृत प्रवेश, माहितीची चोरी आणि सायबर फसवणुकीचा धोका**
* **अधिकारी-कर्मचाऱ्यांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहननवी दिल्ली,**

लातूर/प्रतिनिधी

शासकीय कार्यालयांमध्ये संगणकावरून व्हॉट्सॲप वेबचा वापर करताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाने केले आहे. व्हॉट्सॲप वेबच्या लॉगिन सत्राचा गैरवापर करून वापरकर्त्यांच्या खात्यांमध्ये अनधिकृत प्रवेश मिळविण्याचा धोका भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या राष्ट्रीय सायबर गुन्हे धोका विश्लेषण विभागाने अधोरेखित केला आहे. या पार्श्वभूमीवर गृह मंत्रालयाने सायबर सुरक्षेबाबत सतर्कतेचा इशारा दिला आहे.व्हॉट्सॲप वेबच्या लॉगिन सत्रावर सायबर गुन्हेगारांनी अनधिकृत ताबा मिळवल्यास संबंधित खात्यातील संदेश वाचणे, वापरकर्त्याच्या नावाने संदेश पाठविणे, संपर्क क्रमांक आणि ग्रुपमधील संभाषणांची माहिती मिळविणे शक्य होते. अशा प्रवेशाचा वापर करून शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची ओळख धारण करणे, आर्थिक फसवणूक करणे गुन्हे घडविण्याचा धोका आहे.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, तनिश ऑर्चिड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी रोड, चरोली फाटा, ता.हवेली, जि.पुणे, महाराष्ट्र ४१२१०५ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. * पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) इमेल:-jagmitra2010@gmail.com

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, Tanish Orchid, Phase 2, R-Wing, 1105, Alandi Rd, Charoli Phata, Ta. Haveli, Dist. Pune, Maharashtra 412105. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

25 Nov 2026 Nanded page 5:Layout 1 11/25/2026 1:12 AM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल (जिल्हा प्रतिनिधी) शेख मौला शेख उस्मान (उपसंपादक नांदेड जिल्हा आवृत्ती)

मो.9767785855, 9422797473 मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.२५ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

प्रभाग १२ मध्ये बांधकामाचा मलबा रस्त्यावर; आठवडाभरापासून नागरिकांची गैरसोय!

नांदेड/प्रतिनिधी

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या झोन क्रमांक ५ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १२ मध्ये सार्वजनिक रस्त्यावर बांधकामाचा मोठ्या प्रमाणात मलबा टाकण्यात आल्याने परिसरातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. खान फंक्शन हॉलच्या शेजारील रस्त्यावर मागील आठवडाभरापासून बांधकामाचा मलबा पडून असल्याने रहदारीचा मार्ग अडथळ्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून मनपा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

संबंधित घरमालकाने बांधकामातून निघालेला मलबा आणि बांधकामासाठी आणलेले वाळू मोठ्या प्रमाणातील थेट सार्वजनिक रस्त्यावर टाकल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांसह दुचाकीस्वार आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्ता अडविला गेल्याने नागरिकांना पर्यायी मार्गाचा आधार घ्यावा लागत आहे. बांधकाम अधिकृत की अनधिकृत? नागरिकांचा सवाल.संबंधित ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामासाठी महानगरपालिकेची अधिकृत परवानगी घेण्यात आली आहे का? बांधकामाचे नियम पाळले जात आहेत का? सार्वजनिक रस्त्यावर बांधकामाचा मलबा टाकण्याची परवानगी कोणी दिली? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

महाराष्ट्रात दुष्काळ पडल्यामुळे डोंगरकडा परिसरात पाण्याअभावी भीषण संकट केळी हळद पिके धोक्याचे लक्षण

कळमनुरी/गंगासागर पंडित

हिंगोली जिल्ह्यातील डोंगरकडा व परिसरात यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने शेतीसमोर पाणीटंचाईचे गंभीर संकट उभे राहिले आहे. पावसाअभावी विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावली असून, त्याचा थेट परिणाम शेतीच्या सिंचनावर होत आहे. विशेषतः नगदी पिके म्हणून ओळखली जाणारी केळी, हळद आणि ऊस या पिकांना पाण्याअभावी मोठा फटका बसत आहे.

डोंगरकडा परिसरातील अनेक शेतकरी केळी आणि हळद या नगदी पिकांची लागवड करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. केळीच्या लागवडीसाठी शेतकरी रोपे, खते, औषधे, मजुरी तसेच ठिबक सिंचनावर मोठ्या प्रमाणात खर्च करतात. मात्र, यंदा पावसाने पाठ फिरवल्याने आणि उपलब्ध जलस्रोतांची पाणीपातळी कमी झाल्याने शेतकऱ्यांसमोर पिके जगवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.



परिसरातील काही शेतकऱ्यांनी केळीच्या पिकासाठी हजारो रुपये खर्च करून मेहनतीने बागा उभ्या केल्या होत्या. मात्र, विहिरी व बोअरवेलमध्ये पाणी उपलब्ध नसल्याने पिकांना वेळेवर पाणी देणे शक्य होत नाही. परिणामी, पिके वाळू लागल्याने आणि उत्पादनाची आशा मावळल्याने काही शेतकऱ्यांवर हजारो रुपये खर्च करून उभी केलेली केळीची पिके नाईलाजास्तव उपटून टाकण्याची वेळ आली आहे. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

इसापूर धरणाच्या पाण्याच्या पाळ्या अपुऱ्या

डोंगरकडा परिसरातील शेतीसाठी इसापूर धरणाच्या पाण्यावर अनेक शेतकऱ्यांचे अवलंबित्व आहे. मात्र, यंदा धरणाच्या पाण्याच्या केवळ चार पाळ्या मिळाल्याने शेतकऱ्यांची गरज पूर्ण होत नसल्याची परिस्थिती आहे. धरणाच्या पाण्याच्या पाळ्या अपुऱ्या पडत असल्याने शेतकऱ्यांना विहिरी आणि बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. मात्र, भूजल पातळीही खालावल्याने शेतकऱ्यांची अडचण अधिकच वाढली आहे.

प्रशासनाने दुष्काळाच्या परिस्थितीकडे तातडीने लक्ष द्यावे, प्रलंबित अनुदानाचे वाटप करावे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आणि मजुरांना रोजगार पुरवण्यासाठी रोजगार योजनेचे काम सुरू करावे, अशी मागणी पराग अडकिने, बाळासाहेब गावंडे, मंगेश पंडित, माजी सरपंच शंकरराव राठोड, गोपाळ राठोड इत्यादींनी केली आहे.

आता तरी संबंधित विभागाने जागे होऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

निवघ्यात भक्तीचा गजर; काकड आरतीने परिसर दुमदुमला, हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद

मुदखेड/अतीक अहमद

बारड : भक्ती, श्रद्धा आणि सर्वधर्मीय एकतेचा सुंदर संगम निवघा येथे अनुभवायला मिळाला. श्री महारुद्र हनुमान मंदिर व श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात लखलखत्या पणत्यांचा प्रकाश, टाळ-मृदंगाचा गजर आणि हरिनामाच्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. पहाटे झालेल्या सामूहिक काकड आरतीत गावातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वधर्मीय भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. श्रद्धा ही माणसांना जोडणारी शक्ती असून धर्म वेगळे असले तरी माणुसकी आणि एकतेचा धागा समान असतो, असा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. यावेळी ह.भ.प. दशरथ महाराज अंभोरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिरसाची अनुभूती दिली. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादाने धार्मिक सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमास आ. ॲड. श्रीजया चव्हाण, आ. आनंदराव बोंढारकर, भा.च.स.सा.का.चेअरमन नरेंद्र चव्हाण, महापौर कविता मुळे, नगरसेविका मिनल पाटील, मा.आ.श्यामसुंदर शिंदे, आशा शिंदे, गोविंदराव नागेलीकर, निलेशराव देशमुख, उत्तमराव लोमटे, लक्ष्मणराव जाधव, भगवानराव तिडके, दिलीपराव कोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. धर्म कोणताही असो, माणुसकी आणि परस्पर सन्मान हाच खरा धर्म, हा सर्वधर्मसमभावाचा संदेश निवघ्यातील भक्ती सोहळ्याने दिला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी निवघा ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. यावेळी हजारोंच्या संख्येने भक्तांनी महाप्रसाद घेतला.



गोदावरी नदीपात्रात रेती माफियांवर पोलिसांचा महादणका!



नांदेड/प्रतिनिधी

गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध रेती उपशाविरोधात नांदेड पोलिसांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून, रेती माफियांच्या अवैध साम्राज्याला मोठा हादरा दिला आहे. चिंचोली, महाटी, माळकौठा, सितानदी नाला, कामळज आणि चिलपिंपरी परिसरात नांदेड पोलिसांनी एकाचवेळी धडक मोहीम राबवत तब्बल ५ कोटी २७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये १० मोठ्या लोखंडी बोटींसह ४ छोट्या बोटी जिलेटीनच्या कांड्यांनी ब्लास्ट करून जागीच नष्ट करण्यात आल्या. या कारवाईमुळे गोदावरी नदीपात्रातील अवैध रेती उपसा करणाऱ्या माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर रेती उपसा करून तिची चोरटी वाहतूक केली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार अवैध रेती व्यवसायाविरोधात विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे आणि शासनाचा बुडणारा महसूल वाचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

मुदखेडमध्ये आमदार नाना पटोले, खासदार प्रा.रवींद्र पाटील चव्हाण यांचे जंगी स्वागत

मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती



मुदखेड/अतिक अहमद

काँग्रेस पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा विधानसभा अध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले, नांदेड जिल्ह्याचे खासदार प्रा. रवींद्र पाटील चव्हाण तसेच नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उत्तर विभागाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलभाऊ पावडे हे सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी एका कार्यक्रमानिमित्त मुदखेड येथे आले असता मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांचे उत्साहात जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मान्यवरांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. या स्वागत सोहळ्यात स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

याप्रसंगी माजी उपाध्यक्ष करीम खान, माजी नगरसेवक गोविंद गोपनपल्ले, माजी नगरसेवक गोविंद प्रसाद कालाणी, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार, नगरपरिषदेतील गटनेत्यांचे प्रतिनिधी मुजीब पठाण, सेवा दलाचे तालुकाध्यक्ष गंगाधर पाटील मगरे, नगरसेवक अब्दुल खदिर खाजामिया, खदिर कुरेशी, अतिक अहमद, वेदांत शेवटे,गजानन संबोड, माणिका मुंगल, रमेश बोडके,विश्वनाथ पाटील पवार, राजेश पाटील पवार, गौस भाई फूलवाले, बालाजी सूर्यवंशी, भीम महादवाड, सुभाष चौंदंते, रमेश बोडके, मोहम्मद अनीस नायगावकर,आकाश आरेवाड,सुरेश ढगे, नागेश साठे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

डोंगरकडा येथे २४ नोव्हेंबरपासून श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन सोहळ्याचे आयोजन

डोंगरकडा/प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा येथील स्वयंभू श्री जटाशंकर मंदिर परिसरात श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७३० व्या जयंतीनिमित्त श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण व भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर ते मंगळवार, दि. १ डिसेंबर २०२६ या कालावधीत पार पडणार असून परिसरातील भाविकांसाठी ही मोठी पर्वणी ठरणार आहे.

या सोहळ्यात कथा प्रवक्ते ह.भ.प. श्री गणेशानंद महाराज शास्त्री यांच्या मधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे निरूपण होणार आहे. तर ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठाची जबाबदारी श्री बबन महाराज गावंडे सांभाळणार आहेत. आठ दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, लोकगीत भजन, हरिपाठ, भागवत कथा आणि हरिकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

असे राहणार दररोजचे कार्यक्रम

दररोज पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा भजन, सकाळी ६ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते दुपारी १२ लोकगीत भजन, दुपारी ३ ते ४ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, तर रात्री ८ ते १० या वेळेत नामवंत कीर्तनकारांचे हरिकीर्तन होणार आहे.

नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती

या सोहळ्यासाठी विविध भागांतील नामवंत कीर्तनकार उपस्थित राहणार आहेत. यामध्ये महंत श्री सचिन महाराज लावणीकर, ह.भ.प. श्री पांडुरंग महाराज उगले (जालना), ह.भ.प. कांचनताई शेळके (यवतमाळ), ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महाराज जळकेकर (जळगाव), ह.भ.प. श्री माऊली महाराज खडकवाडीकर, ह.भ.प. नेहाताई भोसले (आळंदी देवाची) आदींचा सहभाग राहणार आहे.

१ डिसेंबर रोजी भव्य पालखी मिरवणूक

मंगळवार, दि. १ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता भव्य पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे कीर्तन होणार असून कीर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यात गायनाचार्य ह.भ.प. श्री देविदास पावडे, संतोष फरांदे, मृदंगाचार्य तसेच चोपदार श्री विठ्ठल महाराज मोरे यांची संगीत साथ लाभणार आहे. तसेच जवळा बाजार येथील मृदंगसाधना वारकरी शैक्षणिक संस्थेचेही सहकार्य लाभणार आहे.

भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

वारकरी संप्रदाय हा भक्ती, समता, सेवा आणि बंधुभावाचा संदेश देणारा संप्रदाय आहे. श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण आणि कीर्तनाच्या माध्यमातून समाजात अध्यात्मिक विचारांची रुजवण व्हावी, संतांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि तरुण पिढीला वारकरी परंपरेची ओळख व्हावी, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वयंभू श्री जटाशंकर महाराज यांच्या कृपेने आयोजित करण्यात आलेल्या या भक्तिमय सोहळ्याचा डोंगरकडा परिसरासह हिंगोली, नांदेड व इतर जिल्ह्यांतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक स्वयंभू श्री जटाशंकर विश्वस्त मंडळ व समस्त गावकरी मंडळी डोंगरकडा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

संविधान दिन व क्रांतिवीर लहुजी साळवे जयंतीनिमित्त २८ नोव्हेंबरला राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

नांदेड/प्रतिनिधी

संविधान दिन आणि क्रांतिवीर लहुजी साळवे जयंतीचे औचित्य साधून समाजप्रबोधनपर व्याख्यान, तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन दि. २८ नोव्हेंबर २०२६ वार शनिवार रोजी नांदेड येथे करण्यात आले आहे. बहुजन शक्ती सेना महाराष्ट्र, राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र आणि फकीरा विद्रोही विचारमंच महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने हॉटेल गणराज, नमस्कार चौक, नांदेड येथे हा सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अविनाश घाटे राहणार असून, खासदार रवींद्रजी चव्हाण यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. प्रमुख विशेष अतिथी म्हणून डॉ.अण्णा भाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिनभाऊ साठे, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर (हदगाव), माजी आमदार नामदेवराव ससाने, नांदेड महानगरपालिकेच्या महापौर कविताताई मुळे, नगरसेवक तथा माजी उपमहापौर उमेश पवळे आणि सर्जेराव दादा पाटील ढगे यांची उपस्थिती राहणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून सुशीलप्रकाश चिमोरे हे समाजप्रबोधनपर विचार मांडणार आहेत. तर प्रमुख उपस्थितांमध्ये नगरसेवक डॉ. मंजुषा प्रसाद रानवळकर, लसाकमचे मार्गदर्शक शिवा कांबळे,माजी सनदी अधिकारी व्ही. जे. वरखंटकर, लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रा.रामचंद्र भरांडे, सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक मारुती वाडेकर, माजी नगरसेविका बेबीताई गुपिले, लसाकमचे महासचिव गुणवंत काळे, राज्य प्रवक्ते चंद्रकांत मेकाले,नांदेड महानगरपालिकेचे उपअभियंता प्रकाश कांबळे आणि पारेषण विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अनिल वाघमारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत.

वरूड येथे कार्तिक मासाची मंगळवारी उत्साहात सांगता

कळमनुरी/गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील वरूड येथे कार्तिक मासाची मंगळवारी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. यानिमित्ताने भजन, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



कार्तिक मासानिमित्त वरूड व परिसरातील अनेक गावांमध्ये कीर्तन, भजन, हरिपाठ, गोळण, भारूड आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. पौर्णिमेपासून ते त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत दररोज पहाटे चार ते सकाळी सहा वाजेपर्यंत काकड स्नान, भजन व काकड आरती केली जात होती. मंगळवारी कार्तिक मासाची सांगता मोठ्या उत्साहात करण्यात आली. यानिमित्ताने वरूड येथील हनुमान मंदिराजवळ रिंगण करून भजनी मंडळींनी काकड भजन केले. यावेळी विठ्ठल-रुक्मिणी तसेच हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. धार्मिक कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या या धार्मिक उपक्रमामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थ व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

नांदेडमध्ये गुटखा माफियांवर पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाचा सर्जिकल स्ट्राईक!

नांदेड /शेख मौला

नांदेड : नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचे कंबरडे मोडण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या विशेष पथकाने नांदेड शहरात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध साठ्याविरुद्ध धडक कारवाई करत तब्बल ६८ लाख २५ हजार ६९५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त.केला आहे. या कारवाईत तीन ठिकाणी छापे टाकण्यात आले असून सहा जणांविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे नांदेडमधील गुटखा विक्री आणि साठेबाजी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. इतवारा हद्दीत दोन ठिकाणी छापे; ५४ लाखांचा गुटखा जप्त नांदेड परिक्षेत्रातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी आणि अंमलदारांचे विशेष पथक नांदेड शहरात रवाना केले होते.

दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी या पथकाला इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आमेर फंक्शन हॉलजवळील एका खोलीत तसेच इस्लामपुरा परिसरातील सेंट्रल ट्रान्सपोर्टच्या गोदामात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात अवैध साठा असल्याची गोपनीय माहिती मिळाली.



या माहितीच्या आधारे पथकाने दोन्ही ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. या कारवाईत ५४ लाख ६ हजार ९५ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा.जप्त करण्यात आला.

या प्रकरणी सय्यद दस्तगिर सय्यद इब्राहीम (रा. आस कॉलनी, इतवारा), अब्दुल बबलू अब्दुल हमीद (रा. मदिनानगर, मुदखेड), मोहम्मद आसिफ मोहम्मद हुसेन (रा. चुन्नाभट्टी, खुदबईनगर) आणि अब्दुल तस्लीम अब्दुल मनान सौदागर (रा. गुलशन कॉलनी, इतवारा, नांदेड) यांच्याविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात गुरनं. ४००/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ मधील संबंधित कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

25 Nov 2026_Layout 1 11/24/2026 11:21 PM Page 2

आधी बिबट्यांनी श्वानाच्या पिलाला मारलं, मग श्वानानं घेतला बिबट्याच्या पिलाचा जीव

बीड/प्रतिनिधी

बीडच्या आष्टीतील दोलावडगावच्या थोरात वस्तीवर एक वर्षाच्या बिबट्याच्या पिलाला श्वानाने मारल्याची घटना समोर आली आहे. श्वानाचे खेळत असलेल्या लहान पिलाला बिबट्याने सकाळी मारले. यानंतर दुपारच्या वेळी श्वानाने एक वर्षाच्या बिबट्याच्या शावकाचा बळी घेतला. आष्टीतील दौलावडगाव परिसरात बिबट्याचा वावर असून बिबट्याने अनेक श्वानांना मारल्याच्या घटना याआधी कॅमेऱ्यात देखील कैद झाल्या. काल (सोमवारी, ता २३) एक वेगळीच घटना समोर आली. एक श्वानाचे पिलू परिसरात खेळत असताना सकाळच्या दरम्यान एका पिलाला बिबट्याने मारल्याची घटना घडली. नंतर दुपारच्या दरम्यान कुत्रीने चक्क बिबट्याच्या एक वर्ष वय असलेल्या पिलाला मारल्याची घटना घडली. विशेष म्हणजे कुत्र्याचे पिल्लू आणि शावक असे दोन्ही मृतदेह आढळून आले. आष्टी वनपरिक्षेत्र कार्यालयाकडून मृत बछड्याचे शवविच्छेदन केल्यानंतर या बछड्याचा दफन विधी कार्यालय आवारात करण्यात आला.

कुत्र्याचे पिल्लू आणि शावक असे दोन्ही मृतदेह आढळून आले

आष्टी तालुक्यातील दोलावडगाव येथील थोरात वस्ती परिसरात कुत्र्याच्या हल्ल्यात बिबट्याच्या एका पिल्लाचा



मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. दोलावडगाव येथील थोरात वस्ती परिसरात बिबट्याचे पिल्लू मृतावस्थेत आढळून आले. प्राथमिक माहितीनुसार, कुत्र्याच्या हल्ल्यात या पिल्लाचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. काल (सोमवारी, ता २३) एक वेगळीच घटना समोर आली. एक श्वानाचे पिलू परिसरात खेळत असताना सकाळच्या दरम्यान एका पिलाला बिबट्याने मारल्याची घटना घडली. नंतर दुपारच्या दरम्यान कुत्रीने चक्क बिबट्याच्या एक वर्ष वय असलेल्या पिलाला मारल्याची घटना घडली. विशेष म्हणजे कुत्र्याचे पिल्लू आणि शावक असे दोन्ही मृतदेह आढळून आले.घटनेची माहिती स्थानिक नागरिकांकडून वनविभागाला मिळताच वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पुढील आवश्यक कार्यवाही सुरू केली. आष्टीचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने संपूर्ण घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मृत बिबट्याच्या पिल्लाचे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनानंतर नियमानुसार पुढील प्रक्रिया करण्यात आली.

परळीच्या मुकुंद पूजा विधी साहित्य भांडारमध्ये श्रीडी बारा ज्योतिर्लिंग दर्शनाची अनोखी पर्वणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

प्रभू वैद्यनाथाच्या नगरीतील भाविकांना आता एकाच छताखाली देशातील सर्व बारा ज्योतिर्लिंगांचे प्रत्यक्ष दर्शन घेतल्याचा अनुभव घेता येणार आहे. येथील अरुणोदय मार्केटमधील सुप्रसिद्ध मुकुंद पूजा विधी साहित्य भांडार येथे भाविकांसाठी अत्याधुनिक श्रीडी बारा ज्योतिर्लिंग दर्शन व्हिडिओची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आपल्या व्यस्त दैनंदिन जीवनातून किंवा आर्थिक व शारीरिक कारणांमुळे अनेक भाविकांना देशभरातील बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा करणे शक्य होत नाही. हीच बाब लक्षात घेऊन मुकुंद पूजा विधी साहित्य भांडारच्या वतीने हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे. या श्रीडी तंत्रज्ञानामुळे प्रत्यक्ष मंदिरात उभे राहून दर्शन घेत असल्याचा जिवंत आणि अलौकिक अनुभव भाविकांना मिळत आहे.

या उपक्रमाबद्दल माहिती देताना दुकान चालक मुकुंद गोपाळ आंधळे यांनी सांगितले की, ''परळी हे स्वतः एक ज्योतिर्लिंग क्षेत्र असल्याने येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. त्यांना उर्वरित अकरा ज्योतिर्लिंगांचेही भक्तिभावाने दर्शन घडावे, या हेतूने ही व्यवस्था करण्यात आली आहे.''

शहरातील तसेच ग्रामीण भागातील भाविक या श्रीडी दर्शनाचा लाभ घेण्यासाठी अरुणोदय मार्केटमध्ये मोठी गर्दी करत आहेत. सर्व शिवभक्तांनी व नागरिकांनी या आगळ्यावेगळ्या अध्यात्मिक अनुभवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुकुंद पूजा विधी साहित्य भांडारच्या वतीने करण्यात आले आहे.

आ.प्रशांत बंब यांनी शिक्षकांना बदनाम करण्याची सुपारी घेतलीय का?–संघटनेचा आक्रमक सवाल

बंब यांच्यावर जोरदार हल्लाबोल; शिक्षक फोबिया मधून बाहेर येण्याचा थेट इशारा

बीड/प्रतिनिधी

''सार्वजनिक शिक्षण व्यवस्था आणि शिक्षकांना बदनाम करून पालकांना दुसरीकडे वळवण्याचा डाव आहे का? सरकारी शाळांचे खाजगीकरण करण्याची सुपारी तर घेतली नाही ना?'' असा घणाघाती सवाल करत आमदार प्रशांत बंब यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत समाचार मराठवाडा शिक्षक संघटनेकडून घेण्यात आला आहे. शिक्षक हा केवळ वेतन घेऊन काम करणारा कर्मचारी नसून तो समाज घडवणारा आणि देशाचा शिल्पकार आहे; त्यामुळे त्यांच्यावर खालच्या पातळीवर टीका करणे खपवून घेतले जाणार नाही असा थेट इशाराही संघटनेचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी करत राज्यातील आणि देशातील शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव मांडत शिक्षकांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात असल्याचा आरोप करण्यात



आला आहे.

महाराष्ट्रामध्ये २००१ पासून ६५ हजार शिक्षक विनावेतन किंवा अल्पवेतनावर राबत आहेत. त्यांची अवस्था काय आहे आणि संसार कसा चालतो, याची साधी माहितीही घेतली जात नाही. कार्यरत शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा बोजा लादला जातो, ज्यामुळे त्यांना शिकवण्यासाठी वेळच उरत नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये किती जागा रिक्त आहेत किंवा विषयानुसार शिक्षक आहेत का, याचा अभ्यास न करताच टीका केली जाते. देशात ९२ हजार सरकारी शाळा बंद पडल्या, त्याला केवळ शिक्षक जबाबदार नाहीत. महाविद्यालये आणि सीएचबीवर काम करणारे ग्रॅज्युएट, डबल ग्रॅज्युएट, पीएच.डी., नेट-सेट उत्तीर्ण प्राध्यापक कमी मोबदल्यात काम करत आहेत, ज्यामुळे अनेकांची लग्नंही रखडली आहेत. (पान २ वर)

ज्ञान जोती सावित्रीमाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडची कार्यकारणी जाहीर



बीड/प्रतिनिधी

जोती सावित्रीमाई फुलेयांची १९६ वी जयंती गतवर्षी प्रमाणे मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे ठरले असून महाराष्ट्राज्यातील सर्वात मोठा व विविध सामाजिक कार्यातून साजरा होणारा हा उत्सव याची नुतन कार्यकारणी निवडण्यात आली असून अध्यक्षपदी सौ.अलका शिंदे (राऊत) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नुतन कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी सौ.मंदाकिनी राऊत, व सौ.सिमा बनसोडे(ढवळे), सचिव सौ.सुरेखा थोरात, सहसचिव सौ.सिमा नाईक, कोषाध्यक्ष सौ.मनीषा काळे, सहकोषाध्यक्ष सौ.कोमल शिंदे, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यकारणी सदस्य म्हणून (पान २ वर)

दुष्काळाशी दोन हात करण्यासाठी ग्लोबल ट्रस्टचा पुढाकार; मयंक गांधी यांची जैतापूर येथे दुष्काळी पाहणी

धारूर/अतूल शिनगारे

बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि शेतमजूर मोठ्या संकटात सापडले असून, शेतीपिकांचे नुकसान, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पाण्याची टंचाई अशा अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी ग्लोबल ट्रस्टने पुढाकार घेतला असून, ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी जैतापूर येथे भेट देऊन दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थ, शेतकरी आणि शेतमजुरांशी संवाद साधत त्यांना धीर दिला आणि दुष्काळाशी दोन हात करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.यावेळी सरपंच भागवत दराडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावर्षी पाऊस नसल्याने भिषण दुष्काळी



परिस्थिती निर्माण झाली असुन, यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत.तसेच पशुधनही संकटात आले आहे.अशा दुष्काळजन्य परिस्थितीत ग्लोबल ट्रस्टचे मयंक गांधी यांनी सोमवारी जैतापुर ता.धारूर येथे भेट दिली.यावेळी सरपंच भागवतराव दराडे यांनी त्यांचे स्वागत केले.या भेटीदरम्यान मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांशी मुक्त संवाद साधत केवळ आश्वासनांवर न थांबता दुष्काळ निवारणासाठी विविध ठोस उपाययोजना राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. गावातील प्रत्येक शेतकरी आणि शेतमजुराला संस्थेच्या माध्यमातून आवश्यक किटचे वाटप करण्यात येईल.तसेच दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण (पान २ वर)

राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक आघाडीच्या बीड जिल्हा सचिवपदी नारायण गवते यांची नियुक्ती!



बीड/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा शिक्षक आघाडीच्या जिल्हा सचिवपदी श्री. नारायण गवते सर यांची नियुक्ती करण्यात आली. पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र मस्के यांच्या हस्ते बीड येथील संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालयात त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य प्रवक्ते प्रा. शिवराज बांगर सर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष उमेश गायकवाड, शिक्षक आघाडीचे जिल्हा सरचिटणीस अनिल पानसंबळ, पांडुरंग गवते, देशमुख, श्रीराम बहिर, दादासाहेब गवते सर, जीवनराव बागलाने सर, कठाळे सर (पान २ वर)

धारूरमध्ये भाजपची संघटनात्मक बैठक; संत रोहिदास महाराज जयंतीनिमित्त कलश वंदन यात्रा उत्साहात

समरसता संकल्प अभियानांतर्गत पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती

धारूर/अतूल शिनगारे

किल्ले धारूर येथील सुजान लॉन येथे भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक बैठक तसेच समरसता संकल्प अभियानांतर्गत संत रोहिदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त कलश वंदन यात्रा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी भाजपच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी व पक्षविस्ताराबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, माजलगाव मतदारसंघाचे नेते माधव तात्या निर्मळ,



जिल्हा सचिव ॲड. बाळासाहेब चोले, अशोकराव करे, जिल्हा सोशल मीडिया संयोजक अमोल वडतले यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी तालुकाध्यक्ष संदीप काचगुंडे, शहराध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, युवा मोर्चा शहराध्यक्ष ॲड. मोहन भोसले, नगरसेवक विनायक शिनगरे, अशोक करे यांच्यासह भाजपचे विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून पक्षाची संघटनात्मक ताकद (पान २ वर)

डॉ.संकेत तुकाराम सानप यांच्या प्रयत्नांना यश!

मेंदू शस्त्रक्रियेसाठी केदारे यांना १ लाखांची मदत मंजूर सरोळे खुर्दच्या तुकाराम केदारे यांना जीवनदायी मदतीचा हात

नाशिक/प्रतिनिधी

आर्थिक परिस्थिती हलाखीची असलेल्या सरोळे खुर्द (जि. नाशिक निफाड) येथील तुकाराम केदारे यांच्या मेंदूच्या आजारावरील शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत १ लाख रुपयांचा आर्थिक मदत निधी मंजूर झाला आहे. डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केदारे कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून मिळाला आहे.

तुकाराम केदारे यांच्यावर मेंदूच्या आजारासंदर्भात शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता होती. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने उपचारांचा खर्च उभा करणे त्यांच्यासमोर मोठे आव्हान होते. ही बाब लक्षात घेऊन डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक पाठपुरावा केला.



या प्रयत्नांना यश मिळाले असून, एकूण १ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी तातडीने ५० हजार रुपयांचा निधी सुविधा क्रिटीकेअर सेंटर प्रा. लि., मुंबई-आग्रा महामार्ग, नाशिक येथे उपचारांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या आर्थिक मदतीमुळे मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी संघर्ष करणाऱ्या केदारे कुटुंबाला मोठा आधार मिळाला आहे. गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी डॉ. संकेत सानप यांच्याकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

जनसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतून गरजू रुग्णांना उपचारांसाठी मदत मिळवून देण्याचे कार्य सुरू असून, केदारे कुटुंबाला मिळालेला हा दिलासा त्याच सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला आहे. गरिबाच्या मदतीला धावले डॉ. संकेत तुकाराम सानप; मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १ लाखांचा आधार (पान २ वर)

टोकवाडी येथे डॉ.संतोष मुंडे यांना मातृत्वाचा गौरव करणाऱ्या सोहळ्यात 'माय पुरस्कार' प्रदान

'माय महोत्सव हा मातृत्वाचा गौरव करणारा आदर्श उपक्रम; पुरस्काराने सामाजिक कार्याला बळ मिळाले–डॉ. संतोष मुंडे

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

आईच्या त्यागाला, कष्टाला आणि ममतेला सन्मानित करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला 'माय महोत्सव' हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. आईने केलेल्या संघर्षाची आणि संस्कारांची जाणीव ठेवून तिचा गौरव करणे, हीच खरी कृतज्ञता आहे. अशा मातृत्वाचा गौरव करणाऱ्या सोहळ्यात सहभागी होण्याची आणि 'माय पुरस्कार' स्वीकारण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी अभिमानाचा व भावनिक क्षण असल्याचे प्रतिपादन दिव्यांग कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी केले. टोकवाडी येथील डॉ. भरत मुंडे यांच्या पुढाकारातून 'माय महोत्सव' हा मातृत्वाचा गौरव



करणारा आदर्श उपक्रम कौतुकस्पद आहे.'मायपुरस्काराने सामाजिक कार्याला बळ मिळाले असल्याचे प्रतिपादन डॉ. संतोष मुंडे यांनी केले.

टोकवाडी येथे आयोजक डॉ. भरत मुंडे यांच्या पुढाकारातून त्यांच्या मातोश्रींच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त अमृतमहोत्सवी 'माय महोत्सव' व 'माय पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांसाठी सातत्याने धावून जाण्याची भूमिका आणि समाजसेवेतील योगदानाबद्दल डॉ. संतोष मुंडे यांना 'माय पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याची पार्श्वभूमीही तितकीच हृदयस्पर्शी आहे. डॉ. भरत मुंडे व त्यांच्या सात भावंडांचे वडील लहानपणीच वारल्याने त्यांच्या आईवर आठही मुलांच्या संगोपनाची जबाबदारी आली. मात्र, परिस्थितीसमोर हार न मानता त्यांनी भाजी विकून आपल्या मुलांना (पान २ वर)



जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४० निवासी संपादक : मकरंद जहागीरदार ९४२२२१६०६१

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740) Resident Editor: Makarand Jahagirdar (Mobile No. 9422216061)

parbhani 25:Layout 1 11/24/2026 11:17 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

परभणी जिल्हा आवृत्ती | बुधवार , दि.२५ नोव्हेंबर २०२६ | पान नं.४

संविधान दिनानिमित्त परभणीत गुरुवारी भव्य संविधान रॅली प सर्व नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन



परभणी । प्रतिनिधी
भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून सत्काय फाउंडेशन, परभणी यांच्या वतीने गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता शहरात भव्य संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संविधानाचा गौरव, लोकशाही मूल्यांचा जागर आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली गांधी नगर येथील गणपती चौकातून प्रारंभ होणार असून विद्यानगर, नानलपेठ, शिवाजी चौक, गांधी पार्क मार्गे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत पोहोहमी देणारे सर्वोच्च मार्गदर्शक आहे. संविधानाने दिलेली लोकशाही मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्यासाठी या रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.या संविधान रॅलीत जात, धर्म, पंथ, भाषा असा कोणताही भेद न करता सर्व भारतीय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि संविधानाच्या सन्मानासाठी एकजुटीने उपसत्काय फाउंडेशनचे आयोजक संजय मुळे यांनी केले आहे.

पँथर माधवराव हातागळे यांना भीमनगर येथे रामदास आठवले यांच्यासह मान्यवरांची श्रद्धांजली

परभणी/प्रतिनिधी
रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा पँथर माधवराव हातागळे यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत भीमनगर नगर, परभणी येथे २३ नोव्हेंबर रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही शोकसभा पार पडली. यावेळी खासदार संजय जाधव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश



संघटक तथा पँथर विजयदादा सोनवणे यांनी दिवंगत माधवराव हातागळे यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी हातागळे यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.या सभेला ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, ॲड. लक्ष्मण बनसोड, डी.एन. दाभाडे, राणूबाई व्हायवळ, डॉ. सिद्धार्थ भालेराव, उत्तमराव व्हावळे, मिलिंद शिराढोणकर, माधवराव हातागळे यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली आहे. हत्तीआंबिरे, पालमकर, अनिल कांबळे, शेख मगदूम, कैलास दाभाडे, देविदास कांबळे, प्रा. दासू वाघमारे, भास्कर रोडे, वसंत मुळे, शाहीर गौतम कांबळे, मनोहर सावंत, बाबासाहेब कांबळे यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे मराठवाड्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी दिवंगत माधवराव हातागळे यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या.

धर्मापुरी येथे प्रशिक्षणार्थी शिक्षकांशी साधला आ. विक्रम काळे यांनी संवाद मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे पेन्शनचा प्रश्न मांडल्याची माहिती

परभणी/प्रतिनिधी
शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, जुनी पेन्शन योजना आणि शाळांना प्रचलित धोरणानुसार शंभर टक्के अनुदान मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहेत. हे प्रश्न मार्गी लागल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी दिली.तालुक्यातील धर्मापुरी येथील ज्ञानसाधना प्रतिष्ठानमध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी यांच्या वतीने वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाला रविवारी (दि. २२) सकाळी परिपाठ सुरू असताना आमदार विक्रम काळे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांशी संवाद साधत त्यांच्या प्रश्नांची माहिती घेतली.याप्रसंगी प्रशिक्षण समन्वयक तथा ज्येष्ठ अधिव्याख्याता गणेश शिंदे, ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के, सिनेट सदस्य इंजि. नारायण चौधरी, प्रा. मगदूम, अजय देशमुख, विश्वनाथ शिंदे, अजमत खान, गुलाब कदम, रामप्रसाद अवचार, मारुती नवटक्के आदी उपस्थित होते.यावेळी आमदार काळे म्हणाले की, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांची भेट घेऊन शिक्षकांच्या



प्रलंबित प्रश्नांबाबत निवेदन दिले आहे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त होऊन त्यानंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गत अधिवेशनात आश्वासन दिल्याप्रमाणे टप्पा अनुदानित शाळांना प्रचलित धोरणानुसार शंभर टक्के अनुदान द्यावे आणि त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना समान अनुदानाच्या टप्प्यावर आणावे, अशीही मागणी केली आहे.या मागण्यांवर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले आहे. शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी आपला पाठपुरावा सुरूच राहील, असेही आमदार काळे यांनी स्पष्ट केले.

संभाजी खांडरे यांच्या निवेदनाची केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून महाराष्ट्र शासनाकडे तपासणी व कार्यवाहीसाठी पाठवणी

हिंगोली /प्रतिनिधी
हिंगोली जिल्ह्यातील आरोग्य सुविधांचे सक्षमीकरण करून नागरिकांना दर्जेदार आणि अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या मागणीची भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने दखल घेतली आहे. दिग्रस बुद्रुक (ता. कळमनुरी) येथील संभाजी मारुती खांडरे यांनी केंद्र सरकारकडे सादर केलेल्या निवेदनावर मंत्रालयाने कार्यवाही करत संबंधित पत्र महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मिशन डायरेक्टर यांच्याकडे आवश्यक तपासणी व पुढील कार्यवाहीसाठी पाठवले आहे.केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भात अधिकृत पत्र जारी केले आहे. या पत्रात



संभाजी खांडरे यांनी २४ ऑगस्ट २०२६ रोजी ई-मेलद्वारे सादर केलेल्या निवेदनाचा संदर्भ देण्यात आला आहे.हिंगोली जिल्ह्यात वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य सुविधांचा विस्तार होणे आवश्यक असून, जिल्ह्यात १०० खाटांचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात यावे, सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य संस्थांचे आधुनिकीकरण करण्यात यावे, तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी तसेच आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशा प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.याशिवाय आधुनिक निदान सुविधा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, आवश्यक वैद्यकीय उपकरणे, पुरेसा औषधसाठा, रुग्णवाहिका सेवा आणि चोवीस तास आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील रुग्णांना वेळेवर आणि दर्जेदार उपचार मिळण्यास मदत होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने आपल्या पत्रात सार्वजनिक आरोग्य आणि रुग्णालये हा राज्य सरकारच्या अखत्यारीतील विषय असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकरणाची योग्य तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी आणि मंत्रालयालाही त्याबाबत अवगत करावे, असे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मिशन डायरेक्टर यांना दिले आहेत.केंद्र सरकारकडून निवेदनाची दखल घेऊन ते राज्य शासनाकडे पाठविण्यात आल्याने हिंगोली जिल्ह्यातील आरोग्य सुविधांच्या प्रश्नाला आता प्रशासकीय स्तरावर चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आता महाराष्ट्र शासन आणि आरोग्य विभाग यावर कोणती ठोस कार्यवाही करतात, याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

माणुसकीचा जिवंत झरा! अपघातात जखमी झालेल्या दोन गाईंना शुभम ठाकुर यांच्या अथक प्रयत्नांमुळे मिळाले नवे जीवन!

प्रतिनिधी/ सावनेर
माणुसकी केवळ माणसांपुरती मर्यादित नसून मुक्या प्राण्यांच्या वेदना समजून घेऊन त्यांच्या मदतीसाठी धावून जाण्यातही खरी माणुसकी दिसून येते. याचाच प्रत्यय सावनेर शहरात सामाजिक कार्यकर्ते शुभम ठाकुर यांनी आपल्या सेवाभावी कार्यातून घडवून आणला आहे.काही दिवसांपूर्वी सावनेर येथील अंबिका बारसमोर झालेल्या अपघातात एका गाईचा जागीच मृत्यू झाला होता, तर दोन गाई गंभीर जखमी झाल्या होत्या. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते शुभम ठाकुर यांनी क्षणाचाही विलंब न करता पुढाकार घेत ज ार घेत मुक्या जीवांना मदतीचा हात देत समाजासमोर माणुसकीचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या संवेदनशील वृत्तीमुळे केवळ दोन गाईंचे प्राण वाचविण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत, तर समाजात प्राणीमात्रांविषयी दया, करुणा आणि सेवाभावाची भावनाही



अधोरेखित झाली आहे.शुभम ठाकुर यांचे हे कार्य खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे. पद, प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धीपेक्षाील वृत्तीमुळे केवळ दोन गाईंचे प्राण वाचविण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत, तर समाजात प्राणीमात्रांविषयी
मुक्या प्राण्यांची सेवा हीच खरी माणुसकी, हे शुभम ठाकुर यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.काम बोलते, शब्द नाही!सामाजिक कार्यकर्ता व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) सावनेर शहर प्रमुख शुभम ठाकुर मो. ९२८४८७११९५

सामान्य कार्यकर्त्यापासून राज्यसभेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास; रामराव वडकुते साहेबांचे नेतृत्व सदैव स्मरणात राहील!

सामान्य कार्यकर्त्यापासून राज्यसभेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास; रामराव वडकुते साहेबांचे नेतृत्व सदैव स्मरणात राहील! गणेशदादा हाके पाटील समाजाचे नेते तथा भाजप प्रदेश प्रवक्ते महाराष्ट्र राज्य महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अभ्यासू, संयमी, अनुभवी आणि तळागाळातील म्हणजे रामराव वडकुते साहेब. त्यांच्या निधनाची दुःखद बातमी मनाला सुन्न करणारी असून, एका समर्पित नेतृत्वाला



महाराष्ट्र मुकला आहे.रामराव वडकुते साहेब हे माझे अत्यंत जवळचे स्नेही होते. त्यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळाली, हा माझ्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनातील जिव्हाळ्याचा अनुभव आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी संघटनात्मक बांधणीसाठी मोठे योगदान दिले. कार्यकर्त्यांशी असलेला त्यांचा स्नेह, माणसे जोडण्याची हातोटी आणि प्रत्येकाशी एका सामान्य कुटआपली जबाबदारी सममार्गदर्शन करसामाजिक आणि राजकीय क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.या दुःखद प्रसंगी त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करून मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि वडकुते कुटुंबीयांसह सर्व आप्तस्वकीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ प्रदान करो, हीच प्रार्थना.रामराव वडकुते साहेबांचे कार्य, विचार आणि आठवणी सदैव आमच्या स्मरणात राहतील. त्यांचे प्रेरणादायी जीवनकार्य हीच

हद्दीबाहेरील तडीपार आरोपीवर हिंगणा पोलिसांची धडक कारवाई;

आरोपी प्रतीक उर्फ गोलू पटले पोलिसांच्या ताब्यात

हिंगणा/प्रतिनिधी
कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी हिंगणा पोलीस स्टेशनने धडक कारवाई करत तडीपार आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे हिंगणा पोलिसांची सतर्कता आणि कर्तव्यदक्षता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. प्राप्त माहितीनुसार, आरोपी प्रतीक उर्फ गोलू रामनरेश पटले (वय २६ वर्षे, रा. श्रमिक नगर झोपडपट्टी, पोलीस स्टेशन बेलतरवाडी) याच्याविरुद्ध क्रमांक ४८६/२०२६ अन्वये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार कारवाई



करण्यात आली आहे. आरोपी हा दुसऱ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील असून तडीपार असतानाही कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी हिंगणा पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाई केली. ही धडक कारवाई हिंगणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत पीएसआय सावत्कार, पोलीस हवालदार अरुण कांबे (बक्कल क्रमांक ११९९), गजानन भटकर (बक्कल क्रमांक १६३), किशोर बेलेकर (बक्कल क्रमांक १५००) तसेच पोलीस अंमलदार अनिल झाडे (बक्कल क्रमांक ६३८१) यांच्या तपास पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. दुसऱ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तडीपार आरोपीला शोधून ताब्यात घेण्याची हिंगणा पोलिसांची ही कारवाई कौतुकास्पद आहे. पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून गुन्हेगारी प्रवृत्तीविरुद्ध सातत्याने प्रभावी कारवाई केली जात असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी हिंगणा पोलीस तत्पर असल्याचे या कारवाईतून दिसून आले. हिंगणा पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

संघर्षातून उभे राहिलेले जनसेवक काळाच्या पडद्याआड; डॉ. रामराव वडकुते यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप

पोलिस दलाकडून तीन फैरी झाडून मानवंदना

परभणी/प्रतिनिधी
हिंगोलीचे राज्यसभा खा. डॉ. रामराव वडकुते यांच्या पार्थिवावर सोमवारी (दि. २४) हिंगोलीतील महाकाली नगर परिसरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. संघर्षमय परिस्थितीतून पुढे येत गोरगरीब, उपेक्षित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या या जनसेवकाला राज्यभरातील मंत्री, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिकांनी साश्रूनयनांनी अखेरचा निरोप दिला. पोलिस दलाच्या वतीने हवेत तीन फैरी झाडून त्यांना मानवंदना देण्यात आली.अंत्यविधीस विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पालकमंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार हेमंत पाटील, महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार प्रज्ञा सातव, तान्हाजी मुटकुळे, संतोष बांगर, राजू नवघरे, बाबूराव



पाटील कोहळीकर यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी डॉ. वडकुते यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. प्रा. राम शिंदे म्हणाले की, अत्यंत संघर्षातून पुढे आलेल्या डॉ. वडकुते यांनी सर्वसामान्यांना विकासाचा केंद्रबिंदू मानून आयुष्यभर समाजसेवा केली. महसूल मंत्री बावनकुळे यांनी २२ वर्षांच्या सहवासातील आठवणींना उजाळा देत, अनेक पदे भूषवूनही त्यांनी पदाचा कधीही अभिमान बाळगला नाही. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांची पूर्तता करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनीही त्यांच्या ४० वर्षांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.डॉ. वडकुते (वय ७२) यांचे २२ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथील एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. २३ नोव्हेंबरच्या रात्री त्यांचे पार्थिव हिंगोलीतील नाईक नगर येथील निवासस्थानी आणण्यात आले. तेथून अग्रसेन चौक, इंदिरा गांधी चौक, महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, पोस्ट ऑफिस, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि रिसाला बाजार मार्गे अंत्ययात्रा महाकाली नगर येथे पोहोचली.हिंगोलीतील नाईक नगर येथील निवयावेळी माजी मंत्री महादेव जानकर, राजेश टोपे, डॉ. विकास महात्मे, प्रकाशअण्णा शेंडगे यांच्यासह अनेक मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. अंत्यविधीवेळी उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत खासदारांना आदरांजली वाहिली. त्यांच्या निधनाने हिंगोलीसह राज्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

इन्स्टाग्रामवर पिस्तुलासह दहशत निर्माण करणारा आरोपी परभणी पोलिसांच्या ताब्यात

आर्म्स ॲक्टनुसार कोतवाली ठाण्यात गुन्हा दाखल

परभणी/प्रतिनिधी
इन्स्टाग्रामवर पिस्तुलासह दहशत निर्माण करणारी रील प्रसारित करणाऱ्या तसेच गंभीर गुन्ह्यांमध्ये पाहिजे असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. उमर दिलदार खान (रा. क्रांतीनगर, परभणी) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून अग्निशस्त्रासारखी दिसणारी एक छर्रे गन आणि दोन लायटर गन जप्त करण्यात आल्या आहेत.परभणी शहरातील कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यांमध्ये उमर खान हा पाहिजे असलेला आरोपी होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक त्याचा शोध घेत



असताना तो एमके टाईल्स या दुकानात आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्यातील सहभागाची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.दरम्यान, आरोपीच्या इन्स्टाग्राम खात्याची तपासणी केली असता त्याने पिस्तुलासह दहशत निर्माण करणारी रील प्रसारित केल्याचे निदर्शनास आले. याबाबत पोलिसांनी त्याच्याकडे विचारणा केली असता त्याच्याकडून एक छर्रे गन आणि दोन लायटर गन मिळून आल्या. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्टच्या कलम ६ व २८ प्रमाणे स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला पुढील कारवाईसाठी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, गणेश सवंडकर, मधुकर चट्टे, पोलीस अंमलदार सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ आणि नेताजी गीते यांचा समावेश होता. या प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, तनिश ऑर्चिड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी रोड, चरोली फाटा, ता.हवेली, जि.पुणे, महाराष्ट्र ४१२१०५ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. * पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) इमेल:-jagmitra2010@gmail.com

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, Tanish Orchid, Phase 2, R-Wing, 1105, Alandi Rd, Charoli Phata, Ta. Haveli, Dist. Pune, Maharashtra 412105. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

24Nov Latur page 4:Layout 1 11/24/2026 10:06 PM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

PRGI.No.- MHMAR/26/A2511

पुणे जिल्हा आवृत्ती — बुधवार ,दि.२५ नोव्हेंबर २०२६ — पान क्र.५

एक-दोन बॉल खेळल्यानंतरच मला..., २०४ धावांची वादळी खेळी करणाऱ्या वैभव सूर्यवंशीची पहिली प्रतिक्रिया, बेबी बॉस काय म्हणाला?

:युवा खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या विक्रमी २०४ धावांच्या जोरावर भारत अ संघानं १५ व्या ओव्हरमध्ये यूएईला पराभूत करत आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेत प्रवेश केला आहे.आशिया कप रायझिंग स्टार्स २०२६ च्या उपांत्य फेरीत भारतानं प्रवेश केला आहे. भारतानं वैभव सूर्यवंशीच्या वादळी २०४ धावांच्या खेळीच्या जोरावर यूएईवर ७ विकेटनं विजय मिळवला आहे. वैभव



शिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेत प्रवेश केला आसूर्यवंशीनं आक्रमक फलंदाजी केल्यानं भारतानं १४.२ ओव्हरमध्येच २४९ धावांचं आव्हान पूर्ण केलं. वैभवने ५३ बॉलमध्ये २०४ धावा केल्या. या खेळीत त्यानं ७ चौकार आणि २८ षटकार मारले. या खेळीसाठी वैभवला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार देण्यात आला. यावेळी त्यानं विविध मुद्यांवर भाष्य केलं.

रायगडच्या डोंगरमाथ्यांवर पोकलेन-जेसीबीचा घाव ; धनिक विकासकांच्या आर्थिक महत्त्वाकांक्षेपुढे निसर्गाचा बळी!

वृक्षतोड, डोंगरांचे सपाटीकरण, बेसुमार उत्खनन, जमिनींच्या व्यवहाराचा गौडबंगाल गोदरेज,हिरानंदानी,अरीहंत,, रियासत,झमीन,वाधवा सारख्या अनेक विकासकांच्या कार्य पद्धतीवर प्रश्न उपस्थित

पनवेल/प्रतिनिधी

रायगडच्या निसर्गरम्य डोंगरमाथ्यांना सध्या पोकलेन आणि जेसीबीच्या घावांनी पोखरण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे का, असा संतप्त सवाल पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. हिरवीगार वनसंपत्ती, शेकडो वर्षांची झाडे, डोंगररांगा, नैसर्गिक जलस्रोत आणि दऱ्याखोऱ्यांच्या सौंदर्याने नटलेल्या रायगड जिल्ह्याच्या नैसर्गिक ओळखीवर विकासाच्या नावाखाली मोठे संकट निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. तिसऱ्या मुंबईच्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर पनवेल, खालापूर, कर्जत आणि परिसरातील मोक्याच्या जमिनींना आलेले व्यावसायिक महत्त्व पाहता धनिक बांधकाम व्यावसायिकांच्या आर्थिक महत्त्वाकांक्षेपुढे निसर्गसंपत्तीचे अस्तित्व धोक्यात येणार नाही ना, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेषतः पनवेल तालुक्यातील पळस्पे कसळखंड,भोकरपाडा, भिंगार वाडी, ठोंबरेवाडी,तळेगाव आजिवली, खारघर, फणसवाडी, खानावळे, दांड, रसायनी, सावळे, देवलोळी, नांदगाव, उलवे, पळसधरी आणि शिरढोण यांसारख्या परिसरांतील विवादित कथित जमीन व्यवहार आणि संभाव्य विकासकामांच्या पार्श्वभूमीवर वृक्षतोड, डोंगरमाथ्यांचे सपाटीकरण, माती व दगडांचे उत्खनन, नैसर्गिक नाल्यांमधील बदल आणि मोठ्या यंत्रसामग्रीच्या वापराबाबत चौकशीची मागणी जोर धरत आहे. शेकडो वर्ष जोपासलेल पर्यावरण नष्ट होत असून उंच,सुंदर, ऋतूत महत्त्व पूर्ण भूमिका बजावणाऱ्या डोंगरांचा पोकलेन-जेसीबीच्या माध्यमातून लचका तोडून गृहप्रकल्पांसाठी जमिनी तयार करण्याचा प्रकार मोठ्या जलद गतीने होत असेल, तर त्यामागील नसर्गिक संकट,भूमिहीन शेतकरी,



कृषी व्यवस्था, औषध, वनस्पती , प्राणी,पक्षी संरक्षण व त्यावर आधारित परवानग्या आणि आर्थिक हितसंबंधांची चर्चा सध्या प्रसार माध्यमातून जोर धरत आहे. काही स्थानिक कॉन्ट्रॅक्टर ,शेठ आर्थिक लाभाच्या आकर्षणापोटी जमिनींचे व्यवहार, उत्खनन आणि बांधकामांना प्राधान्य देत आप आपल्या प्रभागात भविष्यातील संकट निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरणार असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रक्रियेत वृक्षतोडीची परवानगी ,अवैध उत्खनन ,महसूल, भौगोलिक संरक्षण अटी,शर्ती, निकषांवर काना डोळा केला जात असल्याची माहिती समोर येत आहे.डोंगरमाथ्यांवरील कामांची पाहणीत कोणाचे हित जपले जात आहे व त्या मागे कोणाचे पाठबळ आहे हे समोर यावे व बांधकाम व्यावसायिकांच्या जमीन व्यवहारांची, पर्यावरणीय मंजुरींची पडताळणी व्हावी वनविभाग, महसूल विभाग आणि पर्यावरण विभागाचा अहवाल काय ,कोण अधिकारी नेमले गेले आहेत त्यांची नेमकी पारदर्शक ,नैसर्गिक संतुलनावर कोणती भूमिका बजावत आहे या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर ठेवणे आवश्यक ठरत आहे. काहींना आज कोट्यवधींचा आर्थिक लाभ मिळविणार पण धनधांडगे विकासक उद्या आपले प्रकल्प पूर्ण करून दुसऱ्या संधी कडे पाहून निघून जातील; संबंधित अधिकाऱ्यांच्या या ठिकाणाहून दुसरीकडे बदल्याही होतील. मात्र अनेक वर्षे जन्मभूमीत राहणारा निसर्गाच्या माध्यमातून जगणारा भूमिपुत्र मराठी माणूस या मातीच्यात आपली ओळख संपुष्टात आणत राहणार आहे. त्याची पारंपरिक संस्कृती, गावांची ओळख आणि निसर्गाशी जोडलेले जीवन मात्र कायमचे बदलेलं. पुढील पिढीला पूर्वीचे हिरवेगार डोंगर, स्वच्छ पाण्याचे झरे आणि निसर्गरम्य परिसर केवळ जुन्या छायाचित्रांतून किंवा आई-वडिलांच्या आठवणींतूनच अनुभवावे लागतील, अशी दुर्दैवी परिस्थिती निर्माण होण्याची भीती स्थानिक वयस्क अनुभवी ग्रामस्थ ,शेतकरी, पर्यावरण अभ्यासक व्यक्त करत आहे. प्रदूषण, पाणी,वीज,मूलभूत सुविधांचा संकट, पर्यावरणातील बदल हे केवळ भूमिपुत्रांच्या कुटुंबाच्या जीवनमान सह अस्तित्वाचा प्रश्न असून पुढील पिढ्यांच्या भविष्याचा गंभीर विषय म्हणून पहिला जात आहे. काही विकासकांच्या प्रलोभनातून प्रवृत्त करणाऱ्या आर्थिक षड्यंत्रातून मराठी माणूस जागा हो, रायगडची नैसर्गिक संपत्ती वाचविण्यासाठी एकजुटीचा धागा हो! ही संकल्पना युवकांकडून पुढे येत असून, संबंधित सर्व विभागांकडून अधिकृत माहिती मागवून वृक्षतोड, उत्खनन, बांधकाम परवानग्या आणि जमीन व्यवहारांची चौकशी करण्यासाठी पर्यावरण , पत्रकार संघटनेच्या माध्यमातून शासन-प्रशासनाकडे पाठपुरावा केला जाणार आहे. रायगडचा विकास झाला पाहिजे; पण विकासाच्या नकाशातून रायगडचा निसर्गच पुसला जाणार असेल, तर असा विकास नेमका कोणाच्या भविष्यासाठी हा प्रश्न आता प्रत्येक भूमिपुत्राने आणि जबाबदार अधिकाऱ्याने स्वतःला विचारण्याची वेळ आली असल्याने निर्माण झालेल्या या विषयावर पनवेल रायगड मधील युवा बुद्धिजीवी घटकांनी एकत्रित येऊन या सर्व गंभीर विषयांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत संघटित शक्तीच्या बळावर कायदेशीर पाऊल उचलून या सर्व बाबींवर आळा घालण्यासाठी मोर्चे बांधणी केलेली पाहायला मिळत आहे. संबंधित विभागाचे अधिकारी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दिलेल्या परवानग्या व वास्तविक परिस्थितीचा आढावा घेत पुढील काळात नामांकित अशा विकासाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होणारी ही बाब भविष्यात आंदोलन मोर्चा व मार्च च्या माध्यमातून पाहायला मिळेल असे चित्र पाहायला मिळत आहे.

राम पाटील बोरकर यांच्या मागणीला यश

रिसोड पंचायत समितीसाठी आणखी दोन ग्रामीण गृह निर्माण अभियंते उपलब्ध; आता एकूण संख्या पाच

रिसोड /प्रतिनिधी

पंचायत समिती रिसोड अंतर्गत ग्रामीण भागातील घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, घरकुल लाभार्थ्यांची गैरसोय दूर व्हावी तसेच घरकुल बांधकामांच्या तांत्रिक कामांना गती मिळावी, यासाठी रिसोड पंचायत समितीमध्ये ग्रामीण गृह निर्माण अभियंत्यांची () संख्या वाढविण्याची मागणी राम पाटील बोरकर यांनी केली होती. यासंदर्भात त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले होते. तसेच प्रत्यक्ष भेट घेऊन या प्रश्नाचे गांभीर्य प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. या मागणीची दखल घेत रिसोड पंचायत समितीसाठी नव्याने दोन ग्रामीण गृह निर्माण अभियंते उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यापूर्वी पंचायत समितीमध्ये तीन कार्यरत होते. आता नव्याने दोन अभियंत्यांची भर पडल्याने रिसोड पंचायत समितीत एकूण पाच ग्रामीण गृह निर्माण अभियंते उपलब्ध झाले आहेत. यामध्ये अर्यन मोहने आणि गणेश उगले यांचा समावेश आहे. या कार्यवाहीबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती रिसोड यांनी दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी रामेश्वर निवृत्ती बोरकर यांना अधिकृत पत्राद्वारे माहिती दिली आहे.ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना वेळेत तांत्रिक मार्गदर्शन मिळावे, घरकुल बांधकामांना गती मिळावी आणि प्रशासकीय कामकाज अधिक सक्षम व्हावे, हा या मागणीमागील मुख्य उद्देश होता. जनतेच्या विण्याची मागणी राम पाटील बोरकर यांनी

संपादक डॉ.संतोष शिवदास आमले यांना 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' प्रदान

मुंबई/प्रतिनिधी

साप्ताहिक भगवे वादळच्या वर्धापन दिनानिमित्त संपादक दत्ता खंदारे यांनी आयोजित केलेल्या भव्य सोहळ्यात पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे दैनिक युवक आधार चे संपादक डॉ. संतोष शिवदास आमले यांना 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. मुंबई येथील धारावी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार डॉ. ज्योती गायकवाड यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करत समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणे, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पत्रकारिता ही केवळ बातम्या प्रसिद्ध करण्यापुरती मर्यादित नसून समाजातील वास्तव परिस्थिती



जनतेसमोर मांडण्याची आणि लोकशाही अधिक सक्षम करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. सत्य, निर्भीडपणा, निष्पक्षता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांच्या आधारावर पत्रकाराने आपले कार्य करणे आवश्यक असते. याच पत्रकारितेच्या आदर्श परंपरेचे स्मरण करून देणारा हा पुरस्कार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेच्या विचारांना अभिवादन करणारा ठरला. साप्ताहिक भगवे वादळच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या सोहळ्यात पत्रकारितेच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यात आला. डॉ. संतोष शिवदास आमले यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे त्यांच्या पत्रकारितेच्या कार्याचा सन्मान झाला असून, पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या पुरस्कारामुळे डॉ. संतोष शिवदास आमले यांच्या सामाजिक व पत्रकारितेच्या कार्याला निश्चितच नवी प्रेरणा मिळणार असून, भविष्यातही त्यांनी निर्भीड, निःपक्ष आणि लोकहितवादी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेचा वारसा जपत समाजहितासाठी कार्य करणाऱ्या पत्रकाराचा झालेला हा गौरव निश्चितच प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे.

जुनी पेन्शन योजना, पगारवाढीसह शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न हिवाळी अधिवेशनात मार्गी लावणार आमदार विक्रम काळे

चाळीसगाव दौऱ्यादरम्यान कन्नड येथे जंगी स्वागत; शिक्षक संघटनेकडून विविध मागण्यांचे निवेदन सादर

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार श्री. विक्रम काळे हे चाळीसगाव येथे जात असताना कन्नड येथे शिक्षक संघटनेच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी जुनी पेन्शन योजना, पगारवाढ व वेतन त्रुटी यांसह शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन त्यांना सादर करण्यात आले. या निवेदनाची गंभीर दखल घेत, आगामी हिवाळी अधिवेशनात शिक्षकांचे हे सर्व प्रश्न प्राधान्याने मार्गी लावू, असे ठाम आश्वासन आमदार विक्रम काळे यांनी दिले.कन्नड येथे आगमनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा शिक्षक समन्वय राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष श्री.



अविनाश काळे आणि शिक्षक प्रतिनिधी श्री. एस. एच. गवळी यांनी आमदार विक्रम काळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी शिक्षकांना भेडसावणाऱ्या ज्वलंत समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या निवेदनाद्वारे शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, प्रलंबित पगारवाढ व वेतन त्रुटी दूर करणे, १०-२०-३० वर्षे आश्वासित प्रगती योजना, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ व अनुदान देणे, संच मान्यतेतील जाचक अटी रद्द करणे आणि शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करणे या प्रमुख मागण्यांकडे आमदारांचे लक्ष वेधण्यात आले.निवेदनातील सर्व मुद्द्यांवर सकारात्मक विचार करून येत्या हिवाळी अधिवेशनात हे प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडले जातील आणि शिक्षकांना नक्कीच न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही आमदार काळे यांनी यावेळी दिली. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे उपस्थित शिक्षक प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले.

महिला सशक्तीकरणासाठी आई समाज कल्याणसंस्थेचा स्तुत्य उपक्रम...ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील

पनवेल (साबीर शेख) : आई समाज कल्याण संस्था, वाळुंजे यांच्या वतीने महिला प्रशिक्षण व सशक्तीकरण केंद्र, तुकडी क्र. चार येथे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थी महिलांना प्रमाणपत्रांसह मोफत शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. महिलांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षणाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिला व विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह संस्थेचे आभार व्यक्त करत, या प्रशिक्षणामुळे कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. सुरक्षित वातावरणात कौशल्यपूर्ण प्रशिक्षण मिळाल्याबद्दल त्यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.प्रशिक्षणार्थींना शिलाई मशीन उपलब्ध करून देणाऱ्येच्या व यांच्या मातोश्री या देखील यावेळी उपस्थित होत्या. त्यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देत आशीर्वाद दिले.प्रमुख पाहुणे उद्योजक, ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील यांनी यशस्वी उद्योजक शेख अब्दुल भाई शेख यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. समाजातील गरजू घटकांना सक्षम बनविण्यासाठी सामाजिक कार्यातून देशसेवा घडावी, तसेच पुढील पिढीला अनुभव आणि मार्गदर्शनाचा लाभ मिळावा, या उद्देशाने आई समाज कल्याण संस्था करीत असलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेच्या भविष्यातील उपक्रमांना आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.कार्यक्रमाला संस्थेचे पंकज पाटील (कार्यकारी समिती सदस्य),अब्दुल रेहमान, प्रशिक्षिका अनिशा खान,गणेश गोंधळी,नासिर शेख, पत्रकार हनिफ कच्छी, साबीर शेख ,डॉ .संगीता राऊळकर , तरन्नुम सय्यद ,तबसूर मुजावर तसेच संस्थेचे पदाधिकारी, प्रशिक्षणार्थी महिला व पालक उपस्थित होते. महिलांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

पाइपलाइनच्या अडथळ्यांवर तोडगा काढण्यासाठी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांचा पुढाकार अधिकाऱ्यांसोबत बैठक;

खोपोली/प्रतिनिधी

खोपोली शहरातील प्रभाग क्रमांक ११ ते १५ मधून जाणाऱ्या पेट्रोलियम पाइपलाइनमुळे रखडलेल्या नागरी विकासकामांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी नगराध्यक्ष कुलदीपक रामदास शेंडे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (२३ नोव्हेंबर) अधिकारी, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे आणि संबंधित प्रभागांतील नगरसेवक व नगरसेविकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.पाइपलाइनच्या सुरक्षिततेच्या नियमांमुळे नालेसफाई, नाल्यांची दुरुस्ती, रस्ते, उद्याने आणि पावसाळ्याच्या कामांमध्ये अ बैठकीत उपस्थित करण्यात आला.



यावेळी नाल्यांची सुधारणा, संरक्षक भिंती, ड्रेनेज व्यवस्था, नाल्यांमधील गाळ काढणे, उद्यानांचा विकास, पेव्हर ब्लॉक, कृत्रिम हिरवळ, पक्के रस्ते आणि वॉकिंग ट्रॅक अशा विविध कामांवर चर्चा झाली.या कामांचा सविस्तर आराखडा खोपोली नगरपरिषद कंपनीकडे सादर करणार आहे. त्यानुसार आवश्यक तांत्रिक मान्यता आणि ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका दर्शविली. तसेच निधीतून आर्थिक सहकार्य मिळविण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.मात्र, या चर्चेचे प्रत्यक्ष विकासकामांत रूपांतर होण्यासाठी आवश्यक परवानग्या आणि निधी उपलब्ध होणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे प्रभाग ११ ते १५ मधील नागरिकांना आता या प्रश्नाच्या प्रत्यक्ष निराकरणाची प्रतीक्षा आहे.

वाडा गावातील वाड्या-वस्त्यांवर पोहोचली महिनाभराची अन्नधान्य मदत

– नगरसेवक निलेश नेवाळे यांच्या पुढाकाराने ४०० किटचे वाटप

– आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक हात मदतीचा'

पिंपरी-चिंचवड/प्रतिनिधी बद्रीनारायण घुगे वाडा गाव-ातील विविध वाड्या-वस्त्यांवरील गरजू कुटुंबांना महिनाभर पुरेल इतके अन्नधान्य असलेल्या ४०० किटचे वाटप रविवारी (दि. २२ नोव्हेंबर) करण्यात आले. नगरसेवक निलेशदादा नेवाळे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.भाजप नेते तथा भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त 'लोकनेत्याच्या वाढदिनानिमित्त लोकसेवेचा यज्ञ' या संकल्पनेतून 'एक हात मदतीचा माणुसकीच्या नात्याचा!' हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत वाडा गावातील वाड्या-वस्त्यांपर्यंत



अन्नधान्याची मदत अन्नधान्य देण्यात आले.वाटपप्रसंगी माजी नगरसेवक अजय सायकर, हिंदुराव पाटील, सुधाकर धुरी, अशोक मगर, युवराज निलवर्ण, मनोज कुहिटे, अंकुश नेवाळे, वाडा गावातील युवा सामाजिक कार्यकर्ते अक्षय केदारी आणि निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशनचे सभासद उपस्थित होते

संविधान दिनानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच भव्य 'संविधान सन्मान दौड-२०२६'चे आयोजन

पिंपरी-चिंचवड, दि. २३ नोव्हेंबर २०२६:

भारतीय संविधानाचा सन्मान, लोकशाही मूल्यांचे संवर्धन आणि युवा पिढीमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड शहरात पहिल्यांदाच भव्य 'संविधान सन्मान दौड-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि शंकरभाऊ जगताप स्पोर्ट्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त



विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे, अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.पिंपरी-चिंचवड महान-गरपालिका आणि शंकरभाऊ जगताप स्पोर्ट्स फाऊंडेशनचा संयुक्त उपक्रम-_गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता क्रांतिगुरु वस्ताद लहुजी साळवे स्मारक चौकातून दौडीला होणार सुरुवात.भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून शहरात अशा प्रकारची भव्य 'संविधान सन्मान दौड' आयोजित करण्याची संकल्पना आमदार शंकर जगताप यांनी मांडली होती. या उपक्रमाच्या माध्यमातून आता दरवर्षी ही भव्य दौड आयोजित कर२६ नोव्हेंबर २०२६ रोजी साळवे स्महोणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे संविधान प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने समाप्त होईल. या दौडीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आयोजकांच्या वतीने विशेष सहभाग प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे. ी आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, महापौर रवि लांडगे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्ष-नेते प्रशांत शितोळे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभत आहे.